मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर » मुंबई, शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९७ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

### केंद्राची असंघटित कामगारांना मोठी भेट; 1 ऑक्टोबरपासून किमान वेतनात वाढ

**नवी दिल्ली:** केंद्र सरकारने गुरुवारी परिवर्तनीय महागाई भत्ता (VDA) मध्ये सुधारणा करुन देशातील असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या वेतनात वाढ केली आहे. आता कामगारांच्या किमान वेतन दरात प्रतिदिन 1035 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कामगार मंत्रालयाच्या निवेदनानुसार, यामुळे कामगारांना वाढत्या खर्चाचा सामना करण्यास मदत होईल. नवीन वेतन दर 1 ऑक्टोबर 2024 पासून लागू होतील. केंद्रीय क्षेत्रातील आस्थापनांतर्गत इमारत बांधकाम, लोडिंग-अनलोडिंग, साफसफाई, घरकाम, खाणकाम आणि कृषी यासह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना याचा थेट लाभ मिळणार आहे.



भाजपने खेळाडू संपवले, महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ करणाऱ्यांना वाचवले पान ४

## बिहारमध्ये मृत्यूचे भयाण तांडव

# जितिया उत्सवादरम्यान बुडून 43 जणांचा मृत्यू

### मृतांमध्ये 37 मुले आणि 6 महिला



**पाटणा**

बिहारमध्ये जितिया सणादरम्यान नदी आणि तलावात आंघोळ करताना झालेल्या अपघातात आतापर्यंत 43 जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये 37 मुले आणि 6 महिलांचा समावेश आहे. या सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

24 आणि 25 सप्टेंबर रोजी हे अपघात झाले. औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक 10 मृत्यू झाले आहेत. येथे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये 8 मुलांचा बुडून मृत्यू झाला. वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या वृत्तानुसार, मृतांचा आकडा वाढू शकतो. अजूनही अनेक लोक बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. राज्यातील 16 जिल्ह्यांमध्ये हे अपघात झाले आहेत. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे.

बिहार, झारखंड आणि पूर्व उत्तर प्रदेशातील काही भागात जिउतिया किंवा जीवितपुत्रिका व्रत पाळले जाते. या दिवशी स्त्रिया आपल्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी 24 तास काहीही न खाता-पिता उपवास करतात. यामध्ये भगवान जीमूतवाहन यांची विधीवत पूजा केली जाते. उपवासाच्या दिवशी सकाळी उठून स्नान करून सूर्यदेवाची पूजा केली जाते. गृहमंदिरात एका ताटात सूर्यनारायणाची मूर्ती बसवली जाते.

## भुजबळांची प्रकृती बिघडली; एअर ॲम्ब्युलन्सने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये



**मुंबई :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची गुरुवारी सायंकाळी प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यानिमित्त ते पुण्याला आले होते. त्यामुळे त्यांना पुण्याहून वैद्यकीय तज्ञांच्या सल्ल्याने त्यांना तातडीने एअर ॲम्ब्युलन्सने मुंबईला हलविण्यात आले. त्यांच्यावर तातडीने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना गुरुवारी सकाळपासून अस्वस्थ वाटू लागले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुण्याचा नियोजित दौरा होता. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी महात्मा फुले यांच्या भिडे वाडा स्मारकाला भेट देणार होते. त्यामुळे मंत्री भुजबळ पुण्यात उपस्थित होते. सकाळपासूनच त्यांना अस्वस्थ वाटत होते. दुपारनंतर त्यांना ताप वाढला घशाचे इन्फेक्शन झाल्याचा संशय होता. त्यांना बोलण्यासाठी देखील त्रास होत होता. त्यामुळे वैद्यकीय तज्ञांच्या सल्ल्याने त्यांना तातडीने एअर ॲम्ब्युलन्सने मुंबईला हलविण्यात आले. मंत्री भुजबळ यांना गुरुवारी दुपारी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्यावर तज्ञ डॉक्टर उपचार करीत आहेत.

## आर्थिक निकषावरील EWS आरक्षण लवकरच रद्द होईल

**प्रतिनिधी**
**मुंबई**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून केंद्रातील मोदी सरकारवर घणाघाती टीका केली आहे. तसेच मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकार आरक्षण संपुष्टात आणण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. चिदंबरम म्हणाले की, आर्थिक निकषावर १० टक्के EWS आरक्षण दिलं जात आहे, या कोट्यामुळे आरक्षण कमकुवत होत आहे, अशी टीकाही पी. चिदंबरम यांनी केली आहे. तसेच हे आरक्षण एक दिवस रद्द होईल, असं भाकितही त्यांनी केलं.



मुंबईत झालेल्या इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये नव्या भारतासाठी काँग्रेसची भूमिका या विषयावर आपलं मत मांडताना चिदंबरम यांनी आरक्षणाबाबत आपलं मत मांडलं. यावेळी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने भाजपा सत्तेत आल्यास संविधान


पान 8 वर

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते 3 परम रुद्र महासंगणकांचे लोकार्पण

### तिन्ही महासंगणक स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी १३० कोटी रुपयांच्या तीन परम रुद्र महा संगणकांचे लोकार्पण केले.हे महा संगणक पुणे, दिल्ली आणि कोलकाता येथे ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय महा संगणकीय प्रणाली अंतर्गत वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी हे महत्वाचे पाऊल आहे. हे तिन्ही महा संगणक स्वदेशी तंत्रज्ञानावर



विकसित करण्यात आले आहेत. अनेक वैज्ञानिक विषयांमध्ये अत्याधुनिक संशोधनासाठी या संगणकांचा वापर होणार आहे.

दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कार्यक्रमाला संबोधित केले. ते म्हणाले की, परम रुद्र महा संगणक, भारत संगणकीय क्षेत्रात स्वावलंबी होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. संगणकीय क्रांतीत आपल्या देशाचे योगदान बिट, बाइट्समध्ये नसून टेराबाइट्स आणि पेटाबाईट्समध्ये असले पाहिजे. त्यामुळे आपण योग्य दिशेने योग्य गतीने वाटचाल करत आहोत, हे या यशामुळे सिद्ध होते.

पान 8

## छत्रपतींचा पुतळा उभारताना अक्षम्य चुका


# गंज, चुकीची वेल्डिंग, कमकुवत फ्रेममुळे पुतळा कोसळला

**प्रतिनिधी**
**मालवण**

मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणाची चौकशी करण्यात आली होती. या चौकशी समितीने १६ पानी अहवाल शासनाकडे सादर केला. गंज, कमकुवत फ्रेम आणि चुकीच्या वेल्डिंगमुळे पुतळा कोसळल्याचे या अहवालामध्य नमूद करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांची पोलिस चौकशी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

मालवण येथील राजकोट किल्ल्यावर असणारा शिवाजी महाराजांचा पुतळा मागच्या महिन्यात कोसळला होता. या घटनेवरून राजकारण प्रचंड तापले होते. यावरून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप झाले. याप्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य सरकारने समितीची स्थापन केली होती. या प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल ३० दिवसांमध्ये सादर करावा, असे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार या घटनेचा १६ पानांचा अहवाल चौकशी समितीने सादर केला आहे.

### चौकशी समितीचा ठपका



शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळयाच्या दुर्घटनेनंतर एका महिन्यानंतर चौकशी समितीने १६ पानांचा अहवाल सरकारकडे सादर केला. या अहवालामध्ये कमकुवत फ्रेम आणि पुतळयाच्या आतमध्ये गंज चढल्यामुळे तो कोसळल्याचे म्हटले आहे. त्याचसोबत पुतळयाला चुकीच्या ठिकाणी वेल्डिंग केल्यामुळे हा पुतळा कोसळला असल्याचे देखील अहवालामध्ये सांगितले आहे.

शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांची पोलिस चौकशी होणार आहे.

पान 8 वर




नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

DIRECTORATE
MAHARASHTRA TOURISM

WORLD TOURISM DAY 2024
TOURISM AND PEACE

UN Tourism




एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री



जागतिक पर्यटन दिन २०२४
पर्यटन म्हणजे शांततेची भाषा
चला करू संकल्प....
शाश्वत व जबाबदार पर्यटनाचा

राज्याला लाभलेला समृद्ध किनारा, गड-किल्ले, उत्कृष्ट प्राचीन मंदिरे, अजिंठा वेरूळची लेणी, थंड हवेची ठिकाणे, राज्यातील विविध पर्यटनस्थळांना नक्की भेट द्या.



एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री
अजित पवार, उपमुख्यमंत्री
गिरीष महाजन, पर्यटन मंत्री

बुकिंग आणि आरक्षणासाठी क्यू आर कोड स्कॅन करा

अधिक माहितीसाठी +९१-९४०३८७८८६४ वर 'Hi' पाठवा
आम्हाला अनुसरण करा MaharashtraTourism @maha_tourism
MaharashtraTourismOfficial diot@maharashtratourism.gov.in
www.maharashtratourism.gov.in
बुकिंग आणि आरक्षणासाठी: mahabooking.com

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

*मुंबई : मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने जे. एम बक्षी या कंपनीमध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२८ असा ४ वर्षाचा वेतन करार करण्यात आला, या वेतन करारामुळे कामगारांना कमीत कमी ४४९६ रुपये तर जास्तीत जास्त ६९५३ रुपये पगार वाढ झाली आहे. सरासरी पगारवाढ ५४०१ रुपये आहे. या वेतन करारावर युनियनच्या वतीने ज्येष्ठ कामगार नेते व युनियनचे अध्यक्ष ॲड. एस. के. शेट्ये, सेक्रेटरी विद्याधर राणे, खजिनदार विकास नलावडे, कामगार प्रतिनिधी म्हणून अरुण खाडे आणि प्रवीण जाधव तर व्यवस्थापनाच्या वतीने उपाध्यक्ष व एच. आर. ई. अरुमुगम आणि मॅनेजर व एच. आर. रितूराज ढाकणे यांनी सह्या केल्या.*



## थोडक्यात

### रक्तदान शिबीराचे आयोजन

**मुंबई:** मुंबई सेंट्रल येथील गोपाळ कृष्ण क्रीडा मंडळाच्या वतीने येत्या रविवारी २९ सप्टेंबर २०२४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. सर जे जे. महानगर रक्तपेढीच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित केले आहे.

ताडदेव येथील गोपाळ कृष्ष क्रीडा मंडळ नवरात्र उत्सव दरवर्षी साजरा करते. यंदा मंडळाचे ४६ वर्ष आहे. उत्सवाच्या अगोदर मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. या शिबिराला अनेक जण हजेरी लावतात. रविवारी सकाळी १० ते दुपारी २ वाजे पर्यंत हे शिबिर गोकुळधाम सोसायटी ताडदेव येथे असणार आहे. मंडळाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात असे अध्यक्ष महंत बोले यांनी सांगितले.

### चर्मकार समाजाचा 1 ऑक्टोबर रोजी मुंबईत मोर्चा

**मुंबई:** चर्मकार समाजाच्या विविध मागण्यांसाठी १ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबईत आझाद मैदानावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मोर्चात संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून चर्मकार समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात येणार आहेत. मोर्चाच्या वतीने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे थकीत कर्ज प्रकरणे माफ करण्यात यावे.,संत रविदास महाराज यांच्या नावे विद्यापीठ सुरू करण्यासाठी १०० एकर जमीन व निधी त्वरित देण्यात यावा.,संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी. बार्टीच्या धर्तीवर संत रविदास कौशल्य विकास केंद्रस्वतंत्रपणे सुरू करण्यात यावे. संत रविदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडावर अध्यक्ष व संचालक मंडळ नेमण्यात यावे. व महामंडळाला मुंबई येथे प्रशस्त असे मुख्य कार्यालय देण्यात यावे. चर्मकार समाजाचा आयोग सुरू करून त्यावर अध्यक्ष नेमण्यात यावा.,राज्यातील गटई कामगारांना गटई स्टॉलचे त्वरित वाटप करण्यात यावे. आदी मागण्या करण्यात येणार असल्याचे राष्ट्रीय चर्मकार महासंघ या अराजकीय सामाजिक संघटनेचे मुंबई अध्यक्षराजू नेटके यांनी सांगितले.

### मुलीच्या विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल

**मुंबई:** अल्पवयीन मुलीच्या मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाठवून तिचे फोटो व्हायरल केल्याने युवकाविरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात पोक्सोसह माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. विनायक सुदाम अहिरे (वय २१) असे संशयित आरोपीचे नाव असून तो उल्हासनगर नंबर एक येथे राहतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक हा तीन वर्षांपासून भिवंडी-कल्याण रस्त्यावरील गोवे नाका परिसरातील मुलीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करून तिचा वेळोवेळी पाठलाग करून जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत होता. तिच्या मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाठवून तिला तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# नालासोपारामध्ये दरड कोसळली; शेकडो घरांवर संकट

## सुदैवाने मोठा अनर्थ टळला



प्रतिनिधी
■ वसई

नालासोपारा पूर्वेतील बावशेत पाडा येथे रात्रीच्या वेळी दरड कोसळल्याची घटना घडली, मात्र कोणतीही जीवितहानी न झाल्याने सुदैवाने मोठा अपघात टळला आहे. येथील शेकडो घरांना धोका निर्माण झाला असून, रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम आहे. नालासोपारा पूर्वेकडील बावशेत पाडा येथे बुधवारी रात्री जोरदार पावसामुळे डोंगराचा काही भाग खचल्याने दरड कोसळली. या घटनेमुळे येथील शेकडो घरांना मोठा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या सुमारास ही दरड कोसळली असली, तरी सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे, कारण आणखी दरडी कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वसई-विरार महानगरपालिकेने यापूर्वीच काही भागांमध्ये दरडी कोसळण्याचा धोका जाहीर केला होता, मात्र याबाबत आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या. स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या परिसरात अशी दुर्घटना घडली असली तरी, या ठिकाणी तातडीने मदत कार्य सुरू करण्यात आले आहे.गेल्या काही वर्षांतील अशा प्रकारच्या घटनांचा विचार करता, महापालिकेच्या भूमिकेवर अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. काही वर्षांपूर्वी माळीन गावात घडलेल्या मोठ्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याचा धोका पावसाच्या थांबण्यामुळे आणि सुदैवाने या घटनेत वाचलेला मोठा जीवितहानी टाळल्यामुळे टळला. तरीही भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटनांपासून बचाव करण्यासाठी महापालिकेने अधिक तत्परतेने काम करणे आवश्यक आहे.

# नायब तहसिलदारांच्या दालनात एसीचा अनधिकृत वापर

## भाजपाची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार





प्रतिनिधी
■ वसई

शासकीय पैशांचा गैरवापर करीत नायब तहसिलदारांनी त्यांच्या कार्यालयांमध्ये एअर कंडीशनर्स लावले असल्याच्या गंभीर आरोपांवर भाजपाने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. या प्रकरणात तातडीची चौकशी करून संबंधित एसी काढण्याची मागणी केली आहे.

वसईच्या तहसिल कार्यालयात काही नायब तहसिलदारांच्या दालनांमध्ये एसी अनधिकृतपणे लावले गेले आहेत. भाजपाच्या वसई शहर मंडळ उपाध्यक्ष निलेश वर्तक यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. त्यांच्या मागणीनुसार, अपर तहसिलदार विनोद धोत्रे, महसुल शाखेचे नायब तहसिलदार शशीकांत नाचण आणि नायब तहसिलदार देवकाते यांच्या कार्यालयांमध्ये लावलेल्या एसींना कोणतीही अधिकृत परवानगी नसल्यामुळे तातडीने काढून टाकले जाणे आवश्यक आहे.

वर्तक यांनी स्पष्ट केले की, शासकीय प्रणालीतील नायब तहसिलदारांना सरकारी पैशातून एसीचा उपयोग करणे शक्य नाही. त्यामुळे या संबंधित अधिकाऱ्यांनी हे एसी स्वतः खरेदी केले आहेत की नाही, याची चौकशी करणे आवश्यक आहे. भाजपाने प्रशासनाच्या निष्क्रियतेवर मात्र चिंता व्यक्त केली आहे.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर कच्च्या डिझेलचा टँकर पलटी!

## ट्राफिक पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टाळला



प्रतिनिधी
■ पालघर

मुंबई आमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील क्रमांक 48 वर मुंबईहून गुजरात दिशेने जात असताना चारोटी पेट्रोल पंपा समोर टॅंकर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कच्च्या डिझेल टॅंकर पलटी जवळच ट्रॅफिक पोलिसांच्या ऑफिस असल्यामुळे वेळेवर ट्राफिक पोचल्याने ट्रॅफिक नियंत्रण केल्याने पुढील होणारे अपघात टाळण्याचे नियोजन करण्यात आले. टॅंकर पलटी झाल्याने टॅंकर मधून जोरात कच्चे डिझेलचा रिसाव होत असल्याने ग्रामस्थांनी डिझेल घेण्याचा स्वाद घेतला परंतु हा अपघात झाल्याने कुठलीही जीवित हानी झाली नाही व पावसामुळे आग लागली नाही हे महत्वाच्या मुद्दा असून मुंबई अहमदाबाद महामार्गावरील अपघातांचा सिलसिला सुरूच असून या होणाऱ्या अपघाताला जबाबदार कोण वाहन चालक, रस्त्यावर पडलेले खड्डे, शासन प्रशासन, कंत्राटदार की आणखीन कोणी? असा सवाल वाहन चालक-मालक करीत आहे

# देवनार कॉलनी भागशाळेच्या विद्यार्थ्यांना मिळणार सुरक्षित छप्पर

■ मुंबई

मुंबई शहर व उपनगरांतील मुंबई महापालिका शाळांची दुरुस्ती क पालिकेकडुनहोत आहे.त्या साठी पालिका कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. याच पार्श्वभूमीवर अलिका लल्लूभाई कंपाउंड, मानखुर्द येथील देवनार कॉलनी इंग्रजी शाळा क्रमांक एक आणि उर्दू शाळा क्रमांक दोन या भागशाळांच्या दुरुस्तीचे काम हाती घेणार आहे. त्यामुळे मुलांना आता सुरक्षित छप्पर मिळणार आहे. या शाळेच्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती आणि दर्जोन्नतीच्या कामावर पालिका एक कोटी ७९ लाख रुपये खर्च करणार आहे.

सध्या या भागशाळा एमएमआरडीएने २००३ मध्ये बांधलेल्या इमारत क्रमांक सात ए, सात बी, १२ ए आणि १२ बी च्या तळमजल्यावरील ३४ गाळ्यांमध्ये भरतात. या गाळयां मधील वर्ग खोल्यांमध्ये रूपांतर केले असून तेथे या दोन्ही भाग शाळांचे मिळून ८६९ विद्यार्थी शिकतात. त्यामुळे सुमारे ९७१ चौरस मीटर क्षेत्रावरील अकरा वर्ग खोल्या, एक कर्मचारी खोली, एक कर्मचारी शौचालय, मुलींचे शौचालय, मुलांचे शौचालय आदींची संरचनात्मक दुरुस्ती आणि दर्जोन्नती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# वसई-विरारमध्ये कचऱ्याचा प्रश्न गंभीर; कुंड्यांचा अभाव आणि नागरिकांची नाराजी



प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर शहरात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनत चालला आहे. रोज हजारो टन कचरा एका डंपिंग ग्राऊंडवर साठवला जातो, मात्र त्यावर कोणतीही आधुनिक प्रक्रिया होत नसल्यामुळे हा प्रश्न जटिल झाला आहे. अनेक भागांमध्ये कचरा कुंड्यांचा अभाव जाणवत आहे, तर सोसायट्यांना दिलेल्या कुंड्या तुटलेल्या असून, कचरा नियमितपणे उचलला जात नसल्याने नागरिकांची नाराजी वाढली आहे.

पालिका प्रशासनाने नव्या 25,000 कचरा कुंड्यांची ऑर्डर दिल्याचे महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले आहे. या कुंड्यांद्वारे ओला आणि सुका कचरा वर्गिकरणाची प्रक्रिया सुरळीत होईल, असा दावा केला जात आहे. मात्र, सध्या कुंड्या भरलेल्या असतानाही कचरा वेळेवर उचलला जात नसल्यामुळे अनेक ठिकाणी कचराच कचरा साचलेला दिसून येतो, ज्यामुळे घाण आणि रोगराई पसरत आहे.

महापालिकेने चालू आर्थिक वर्षात कचरा व्यवस्थापनासाठी 366 कोटींची तरतूद केली आहे, परंतु इतकी मोठी रक्कम असूनही शहरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पालिकेने लवकरात लवकर कचरा व्यवस्थापनावर तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वसईत संगणक परिचालकांच्या वेतनाचा प्रश्न गंभीर

## किमान वेतन व कर्मचारी दर्जाची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यातील 31 ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत संगणक परिचालक ठोक वेतनापासून वंचित आहेत आणि अनेक वर्षांपासून त्यांना शासनाकडून किमान वेतन मिळत नाही. ठेका तत्वावर काम करणारे हे परिचालक महिन्याला केवळ 8 ते 10 हजार रूपये मिळवतात, जे सध्याच्या महागाईच्या काळात पुरेसे नाहीत. संगणक परिचालकांनी आता ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून मान्यता आणि किमान वेतन देण्याची मागणी केली आहे.

वसई-विरार महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर बहुतांश ग्रामपंचायती पालिकेत विलीन झाल्या, परंतु 31 ग्रामपंचायती अद्याप कार्यरत आहेत. या ग्रामपंचायतींमध्ये संगणक परिचालक नागरिकांसाठी विविध शासकीय योजना, दाखले आणि अन्य सेवांसाठी काम करतात. मात्र, त्यांना मिळणारे मानधन अत्यल्प असल्याने त्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला आहे.

2024 मध्ये राज्य शासनाने संगणक परिचालकांच्या मानधनात काहीशी वाढ केली असली, तरी ती ग्रामपंचायतींच्या स्वनिधीतून देण्याची अट घातली. त्यामुळे अनेक ग्रामपंचायतींनी या वाढीला विरोध दर्शवला आहे. संगणक परिचालकांच्या वेतन प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा आणि त्यांना किमान वेतन व स्थायी कर्मचारी दर्जा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# संजय राऊत यांनी राजीनामा द्यावा

## मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांची मागणी



प्रतिनिधी
■ मुंबई

आदित्य ठाकरे आणि त्यांच्या उबाठा सेनेन मागिल २५ वर्षात जी निकृष्ठ दर्जाची कामे केली त्यामुळेच मुंबईकरांना हे भोगावे लागत असून काल जी परिस्थिती निर्माण झाली त्याला तेच जबाबदार आहेत, अशी भूमिका मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांनी आज येथे मांडली. तर संजय राऊत यांनी राजिनामा द्यावा अशी मागणीही त्यांनी केली

मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांनी आज दादर वसंतस्मृती येथे पक्ष कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरे यांनी केलेल्या टीकेला उत्तर दिले.

संजय राऊत यांनी एका महिलेची बदनामी केल्याप्रकरणी न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे. त्यामुळे महिलेची बदनामी करणाऱ्या या व्यक्तीला रश्मी ठाकरे यांनी सामनाच्या कार्यकारी संपादक पदी ठेवू नये. तर त्यांनाही राज्यसभेच्या सदस्य पदी राहण्याचा अधिकार आहे का? त्यांनी राजिनामा दिला पाहिजे, असे आमदार ॲड आशिष शेलार म्हणाले.

**जाहीर सूचना**

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला देण्यात येत आहे की माझे अशील झुल्फिकार नजरआली मरेडीया, एच-१२०२, ग्रीन पार्क, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५३ देत आहेत की, मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग दिनांकित १३/११/२०१८ अनुसार माझे अशील (१) युनुस मन्सुरी आणि (२) गिरीश पटेल, मे. ईश्वर बिल्डर चे प्रोप्रायटर ह्यांना त्याऐवजी, सीटीएस क्रमांक ७,१३,१४,१५,१६,४८,४८/१, ४८/२, ४८३, ४८/४, ४८/५, ४९, ५०, ५७, ६७-ए, ६८, ६८-ए, ६८/२ आणि ६८/३ गाव: आंबिवली, के-पश्चिम वॉर्ड, अंधेरी मध्ये आणि वाद निर्माण झाला त्याऐवजी, असलेल्या जमिनीच्या किंवा जमिनीच्या तुकड्या आणि पार्सलच्या संदर्भात माझ्या क्लायंटच्या बाजूने काही अधिकार तयार केले गेले आहेत, माझे अशिल आणि सार्वजनिक सूचनेमध्ये नाव असलेल्या उपरोक्त व्यक्तींमध्ये आणि माझ्या क्लायंटला खात्री आहे की, उपरोक्त व्यक्ती माझ्या क्लायंटला आधीच नियुक्त केलेल्या काही अधिकारांच्या संदर्भात तृतीय पक्षाशी करार किंवा करार करण्याची शक्यता आहे.
वरील बाबी लक्षात घेता, सध्याच्या सार्वजनिक सूचनेमध्ये नमूद केलेल्या वरील नावाच्या व्यक्तींशी किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही त्रयस्थ पक्षासोबत कोणत्याही चर्चेत किंवा करार किंवा करारामध्ये प्रवेश न करण्याबद्दल आणि किंवा त्यामध्ये प्रवेश न करण्याबद्दल सामान्य जनतेला सूचित केले जाते. माझ्या क्लायंटच्या लेखी आणि लिखित संमतीशिवाय.
ही सार्वजनिक सूचना विपुल सावधगिरीने आणि ग्राहकाला सुचविल्या जाणाऱ्या अशा कायदेशीर उपायांचा अवलंब करण्याच्या हक्काला बगल न देता जारी केली आहे.
**सही/-**
**व्ही. एम. पारकर,** वकील,
१/ बी, ४०३, सामना परिवार सीएचएस लि.
जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३
**ई-मेल: adv.vmparkar@yahoo.in**
**ठिकाण:** मुंबई **दिनांक:** २७/०९/२०२४

**PUBLIC NOTICE**

Malati Raman Memon is a lawful member of Laxmi Mahal Co-Op Society Ltd having address at Daulat Nagar, Borivali (E), She is lawful member of Flat No. 301, in the Laxmi Mahal CHS Ltd; She has died on 22/5/2015 with making nomination.
The society hereby invites claims or objections from the heirs or heirs or other claimants/objectors to the transfer of the said shares/possession of flat and interest in the name of Mrs. Taradevi Vijayaraghavan in the capital/property of deceased member in the Society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased in the capital/property of the Society in the name of Mrs. Taradevi Vijayaraghavan. All legal heirs of said deceased persons have not given their written NOC, but given oral consent to Mrs. Taradevi Vijayaraghavan who is married daughter deceased person. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to deal with the shares and interest of the deceased members in the capital/property of the society in such manner as is provided under the By-laws of the society. The claims/objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased Member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the Bye-laws of the society. A copy of the registered Bye-laws of the society is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society with the secretary of the society between 7 P.M to 9 P.M from the date of publication of the notice till the date of expiry of its period.
For and behalf of
**The Laxmi Mahal Co-op Society Limited**
Sd/-
Hon. Secretary

# गरीब प्रकल्पग्रस्तांची घरे लाटणाऱ्या दलालांवर गुन्हे दाखल करा

## काँग्रेसची एमएमआरडीए आयुक्त संजय मुखर्जींकडे तक्रार



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)तर्फे प्रकल्पबाधित लोकांसाठी राम मंदिर, गोरेगाव (पश्चिम) घरे बांधली होती. या सर्व दोनशेच्या आसपास घरांवर दलालांची नजर पडली. बोगस कागदपत्र बनवून, खोटे लाभार्थी उभे करून दलालांनी करोडोंची माया जमवली. या सर्व दलालांवर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसच्या मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे व गौरव राणे यांनी केला आहे. दरम्यान, याबाबत एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी यांच्याकडे तक्रार केली आहे.

गोरेगाव पश्चिम येथील राम मंदिरच्या ओशिवरा जिल्हा केंद्र (ओडीसी) येथे एमएमआरडीएतर्फे प्रकल्पबाधितांसाठी सिग्मा 1 इमारत बांधली. मुंबईतील गरीब प्रकल्पबाधितांसाठी या सदनिकाचे वाटप करण्यात येणार होते. तसेच धोकादायक स्थितीत असलेल्या एम एमआरडीएच्याच पी 5 मधील इमारतीतील रहिवाशांना येथे स्थलांतरित करण्यात येणार होते. दरम्यान, ठाणे-भिवंडी-कल्याण येथील प्रकल्पग्रस्तांना 140 जणांना एकमे, मानपाडा, ठाणे येथे घरी देण्यात आले. परंतु 15 जणांनी दलालांच्या मदतीने सिग्मा वन इमारतीमध्ये काही घरे मिळवून दिली. या 15 जणांचे त्या ठिकाणी घरे असून त्यांना इथे घरे का देण्यात आली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जर 15 जणांना येथे घर देण्यात आले मग बाकीच्या 125 जणांनाही येथेच घर देण्यात यावे. दरम्यान, सिग्मा 1 मध्ये दलाल अमरजीत, मणी अण्णा, कलीम उर्फ पप्पू टर्नर, रमेश यादव, पोपट तिवारी, अजय बडगुजर, राज टोपे, विजय मोरे या दलालांनी बोगस कागदपत्र बनवून, खोटे लाभार्थी उभे केले. खऱ्या लाभार्थ्यांना घरे मिळालीच नाही. परंतु या सर्व दलालांनी करोडोंची माया जमा केली.

प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या या इमारतीतील एक एक घर 40 ते 50 लाखाला विकले गेल्याचे समजते. या सर्व दलालांनी करोडो रुपयांचा घोटाळा केला आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून सर्व घोटाळेबाज दलालांवर गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे.

# शिवसेनेचा प्रचाराचा भाग म्हणून आता, 'महाविजय संवाद अभियाना'ची घोषणा

## प्रत्येक मतदार संघात पक्ष संघटना मजबूत करणार - खा.श्रीकांत शिंदे



प्रतिनिधी
■ मुंबई

महायुती सरकारची कामे घरोघरी पोहोचवण्यासाठी शिवसेनेने 'महाविजय संवाद' या राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा करून शिवसेना खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी केली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा सेना, महिला आघाडी आणि शिवसेना सोशल मीडिया या तीन विभागांकडून शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४ पासून राज्यभरात हे अभियान राबवले जाणार आहे. यात प्रत्येक विधानसभा मतदार संघाचा आढावा घेऊन पक्ष संघटना मजबूत केली जाईल, अशी माहितीही शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली.

खासदार डॉ. शिंदे म्हणाले की गेल्या दोन अडीच वर्षात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकारने केलेली कामे प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. त्यासाठी पक्षाने 'महाविजय संवाद' हे आणखी एक जनसंपर्क अभियान तयार केले आहे. या अंतर्गत दररोज एका नेत्याने व उपनेत्याने एक विधानसभा मतदार संघाला भेट द्यावी. त्यातील पाच ठिकाणी जाऊन गाठीभेटी घेणे, मेळावे घेतले पाहिजेत, असे या दौऱ्याचे स्वरुप आहे. उद्या शुक्रवारपासून महाविजय संवाद अभियान सुरु होणार असून पहिला टप्पा पाच दिवसांचा असेल.

युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या नेतृत्वात उद्यापासून युवा सेनेकडून भिवंडी ग्रामीणपासून अभियानाची सुरुवात होईल. दररोज ६ विधानसभांना भेट देणार असून यात शाखा भेटी, मेळावे घेतले जातील. नवरात्रौत्सवात मुंबई आसपास विधानसभांना भेटी दिल्या जातील.१३ ऑक्टोबरपासून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि पुढे कोकण असा युवा सेनेचा दौरा असेल, अशी माहिती पूर्वेश सरनाईक यांनी यावेळी दिली.शिवसेना लाडकी बहिण संपर्क अभियान कोकणपासून विदर्भापर्यंत एकाच दिवशी १८ विधानसभांमधून सुरु होणार असून त्याचे नेतृत्व मीनाताई कांबळी करणार आहेत. शिवसेना युवासेनेचे सरचिटणीस आणि शिवसेना सोशल मीडिया राज्य प्रमुख राहुल कनाल यांच्या नेतृत्वात शिवसेना सोशल सैनिकांकडून उद्यापासून नाशिक, नंदुरबार, धुळे, शिर्डी, नगर असा दौरा सुरु होणार आहे.

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.
दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र : व.वि.श.म/ मा.व.ज./२७०/०४-२५ दिनांक :- २६/०९/२०२४

**विद्युत विभाग, प्रभाग समिती जी**
**जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०१ (२०२४-२५)**

वसई विरार शहर माहनगरपालिकेतील ५ विद्युतीय कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांच्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुज्ञाप्राप्त विद्युत ठेकेदाराकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई- निविदा सुचना व निविदा प्रपत्र http://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. २७/०९ / २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून ते दि. ०३/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. ऑनलाईन ई-निविदा http://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. २७/०९/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून ते दि. ०३/१०/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. 07 / 90 / २०२४ रोजी दु. ४.०१ मि. नंतर अथवा इतर सोईच्या दिवशी ऑनलाईन उघडण्यात येतील.

जा.क्र.: - वविशम / उप. आ.प. ३३० /२०२४-२५
दि.:- २५/०९/२०२४

**सही/-**
**(समीर भुमकार)**
**उपायुक्त (परिमंडळ ४)**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 97**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ९७**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : बुधवारी अचानक झालेल्या अतिवृष्टी मुळे जोगेश्वरी पुर्वेकडे गांधीनगर,अंबिका नगर, महाराज भवन, मेघवाडी, फ्रान्सिसवाडी नवलकर मार्केट परिसर येथे मोठ्या प्रमाणावर पाणी शिरून रहिवाशांचे व दुकानदारांचे लाखो रूपयांचे झाले नुकसान झाले. जिल्हाधिकारी व तहसीलदार अंधेरी यांनी तातडीची मदत करावी म्हणून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी जोगेश्वरी विधानसभा सभा संघटक अनंत (बाळा) नर , विधानसभा समन्वयक रविंद्र साळवी उपविभाग प्रमुख बाळा साटम, जयवंत लाड, शाखाप्रमुख प्रदीप गांधी, नंदु ताम्हणकर , मंदार मोरे समन्वयक अंकुश मोर्वेकर, व्यापार विभागाचे संजय सावंत, अजय शिंदे, जेष्ठ शिवसैनिक बाबू पेडणेकर उपस्थित होते.*



# बुधवारच्या पावसात भांडुपमध्ये भिंत, दरड कोसळून 9 जखमी

## अंधेरी पूर्व येथे मेट्रो साठी खोदलेल्या खड्ड्यात पडून महिलेचा मृत्यू



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईत बुधवारी कोसळलेल्या मुसळधार पावसाने मुंबईकरांचे हाल केलेच पण विविध दुर्घटनेत ९ जण जखमी तर एका महिलेचा मृत्यू झाला. भांडुप येथे भिंत कोसळून ३ जण जखमी झाले. भांडुप भागातच दरड कोसळून एक महिला जखमी झाली, तसेच अंधेरी पूर्व येथील एम आय डी सी येथे एम एम आर डी ए विभागामार्फत भुमीगत मेट्रोचे काम चालु असलेल्या ठिकाणी एक महिला नाल्यामध्ये पडून तिचा मृत्यू झाला.

काल मध्य रात्री २ च्या सुमारास भांडूप पश्चिम येथील तुळशीपाडा भांडूप पाईपलाईन रोड, गायत्री विद्यामंदिर जवळ चाळीतील घराच्या भिंतीचा काही भाग पडून ४ जण अडकले होते त्यांना अग्निशमन दलामार्फत सुरक्षित बाहेर काढण्यात आले त्यापैकी ३ जण जखमी होते त्यांना उपचारार्थ सिध्दी हॉस्पीटल, भांडूप येथे पाठविण्यात आले होते. क्रांती पाठोळे(२६), शिला पाठोळे(४५) या जखमी महिलांवर उपचार केल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले. तर सुरेन्द्र पाठोळे(५६) यांना दाखल केले.आहे त्यांची प्रकृती स्थिर असल्याचेही सांगण्यात आले.

बुधवारी सकाळी ०९:२९ वा. भांडुप पश्चिम येथे हनुमान नगर खदान, शिंदे मैदान या ठिकाणी डोगरांचा काही भाग पडुन माती व दगड घरसल्याने एक महिला जखमी झाली होती त्यांना उपचारार्थ एम टी अगरवाल रुग्णालय मुलुंड येथे पाठविण्यात आले होते सादर महिलेवर प्राथमिक उपचार करण्यात आले. सदर महिलेच्या नातेवाईकांमार्फत डामा डिस्वार्ज घेऊन अथर्व रुग्णालय कांदिवली येथे उपचारार्थ दाखल केले आहे. प्रकृती स्थिर असून महिलेचे नाव- माधुरी शर्मा-वय वर्षे / ४३ आहे. सुरक्षिततेचा उपाय म्हणून तीन घरे खाली करण्यात आली आहेत.

बुधवारी रात्री ०९.२० वा. अंधेरी पूर्व येथील जलाशय इमारत, सीप्झ गेट नं-८, एम आय डी सी येथे एम एम आर डी ए विभागामार्फत भुमीगत मेट्रोचे काम चालु असलेल्या ठिकाणी एक महिला नाल्यामध्ये पडली होती तिला अग्निशमन दलामार्फत बाहेर काढुन कुपर रुग्णालय येथे पाठविण्यात आले होते कुपर रुग्णालय डॉ. ज्योती वैद्यकीय अधिकारी यांनी सदर महिलेस मृत घोषीत केले. महिलेचे नाव- विमल अनिल गायकवाड-वय वर्षे ४५ असे आहे.

बुधवारी सकाळी ८ ते काल गुरूवारी सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तासात शहर भागात ११७.१८ मिमी, पूर्व उपनगरात १७०.५८ मिमी आणि पश्चिम उपनगरात १०८.७५ मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद झाली. शहर भागात कुलाबा पंपिंग स्टेशन २०४ मिमी, एन एम जोशी मार्ग पालिका शाळा १६८ मिमी, शिवडी कोळीवाडा १६५ मिमी, सायन प्रतीक्षा नगर पालिका शाळा १६४ मिमी, इतका पाऊस पडल्याची नोंद झाली त्यामुळे हिंदमाता, सक्कर पंचायत, शिवडी रेल्वे स्थानक, सायन रोड नंबर २४ येथे दुपारी १ वाजल्यानंतर पडलेल्या पावसानंतर पाणी साचले होते. पूर्व उपनगरात मानखुर्द फायर स्टेशन २८० मिमी, नूतन विद्या मंदिर २७९ मिमी, घाटकोपरच्या एन वॉर्ड पालिका कार्यालयाजवळ २६० मिमी, भांडुप टेंभीपाडा पालिका शाळा २५० मिमी, टागोर नगर विक्रोळी पालिका शाळा २४५ मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद झाली. त्यामुळे कुर्ला रेल्वे स्टेशन, टेंभी ब्रीज, घाटकोपर वेलकम हॉटेल, विक्रोळी गोदरेज

जेट्टी, कांजुरचा हुमा मॉल, चेंबूर स्वस्तिक पार्क, मानखुर्द रेल्वे स्टेशन, चुना भट्टी येथील भक्ती धाम मंदिर, पवई येथील क्रिस्टल हाऊस, व विक्रोळी येथील परेश पार्क येथे पाणी साचले होते. तर पश्चिम उपनगरात आरे कॉलनी पालिका शाळा १९७ मिमी,बाळासाहेब ठाकरे पालिका शाळा १९२ मिमी, मरोळ फायर स्टेशन १७७ मिमी, मालपा डोंगरी पालिका शाळा १६९ मिमी, आणि के पूर्व पालिका कार्यालय १४८ मिमी पाऊस पडल्याची नोंद झाली. त्यामुळे अंधेरी सब वे, अंधेरी मार्केट,आणि मालाड साईनाथ सब वे येथे पाणी साचले होते. या पाण्याचा संथ गतीने निचरा झाल्याची माहिती पालिकेने दिली.

या पावसामुळे बेस्ट उपक्रमाच्या २१ आणि भाडेतत्त्वावरील ७ बसेसच्या इंजिन मध्ये पाणी गेल्याने नादुरुस्त झाल्या होत्या. तसेच २१ झाडे पडली, शॉर्टसर्किटच्या २१ घटना घडल्या आणि १० ठिकाणी घरे वा भिंती चा भाग पडल्याच्या घटना घडल्या.

### पालिकेने घेतला निष्पाप महिलेचा जीव - रवी राजा

*बुधवारी मुंबईकरांनी पुराचा कहर अनुभवला, तेव्हा दुर्दैवी घटनाही घडली. अंधेरीत एक महिला उघड्या नाल्यात बुडली आणि शेवटी रुग्णालयात नेले असता मृत घोषित केले. पालिका नाला झाकून किंवा मॅनहोल नीट दुरुस्त करू शकत नाहीत. यावर पालिका प्रशासनाने शेकडो कोटी रुपये खर्च करूनही आपले काम व्यवस्थितपणे पार पाडले नाही. पालिकेने सुशोभीकरणावर 1700 कोटी इतका खर्च केला आहे पण एका निष्पापाचा ते जीव वाचवू शकत नाही.अशी संतप्त प्रतिक्रया पालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते रवी राजा यांनी व्यक्त केली आहे.*

# 'गेटवे प्रकल्प' रखडल्यानंतर कुलाबा कॉजवेच्या सुशोभिकरणालाही पालिकेने दिली स्थगिती

प्रतिनिधी
■ मुंबई

कुलाबा कॉजवेवरील फेरीवाल्यांच्या स्टॉल्समध्ये सातत्य राखण्यासाठी एक नवीन प्रोटोटाईप (नमुना) तयार केले गेला आहे. मात्र, प्रोटोटाइप जरी तयार असला तरी कुलाबा कॉजवेच्या विकासासाठी देण्यात आलेला निधी पालिकेने स्थगित केल्यामुळे अतिरिक्त नमुने खरेदीला खीळ बसली आहे, असे भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी सांगितले.



कॉजवेच्या सुशोभीकरणाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून फेरीवाले स्टॉल, दुकानाच्या नावाचे फलक आणि सुधारित रस्त्यांच्या पायाभूत सुविधांसाठी एकसंघ डिझाइनची कल्पना मांडण्यात आली. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या निधीचा वापर करून हा प्रोटोटाइप डिझाईन करण्यासाठी एका तज्ज्ञाची नियुक्ती केली आहे. हे स्टॉल अंदाजे 5 x 5 फूट आहेत. यातून फेरीवाल्यांना एक वेगळी ओळख मिळून त्यांचा सन्मान वाढणार आहे यामागे त्यांना सुविधा प्रदान करणे हा उद्देश आहे. रस्त्यावरून पाहिल्यावर एक प्रमाणित आणि आकर्षक स्टॉल नजरेस पडावा हा ही उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटकांसह मुंबईचे हजारो चाकरमानी या भागात खरेदीसाठी वारंवार येतात. या सुशोभीकरण प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे कुलाबा कॉजवेला जागतिक दर्जाचे शॉपिंग डेस्टिनेशन बनवता येईल, असे नार्वेकर नमूद केले.

### कोणतेही कारण न देता निधी थांबवला

*या उपक्रमाची अधिक माहिती देताना नार्वेकर यांनी सांगितले केले की अंतिम आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) च्या सहकार्याने विकसित करण्यात आला होता आणि त्यानंतर तो मंजूरही करण्यात आला होता. मंजुरीनंतर पालिकेने आवश्यक निधीसाठीची मान्यताही दिली. यामुळे या सुशोभीकरण प्रकल्पाला वेग आला. मात्र मिळालेल्या माहितीनुसार पालिकेने कुठलेही ठोस कारण न देता या प्रकल्पाच्या विरोधात निर्णय घेतला आहे. यामुळे या प्रकल्पाच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. गेटवे ऑफ इंडियाच्या सुशोभीकरण योजनेतही असेच घडले आहे. मुंबईतील प्रमुख स्थळांचे सुशोभीकरण करून त्यांना जागतिक नकाशावर आणण्याच्या प्रयत्नांना पालिकेने खोडा घालू नये असे नार्वेकर म्हणाले.*

# हवामान खात्याचा रेड अॅलर्टचा इशारा हवेत विरला

प्रतिनिधी
■ मुंबई

बुधवारी सायंकाळी उशिरापर्यंत मुंबईत जोरदार बरसात करून दाणादाण उडविणाऱ्या पावसाने हलक्या सरी वगळता काल दिवसभर विश्रांती घेतली. विशेष म्हणजे हवामान खात्याने काल 'रेड अलर्ट ' चा पूर्व इशारा दिला होता. राज्य शासनाने मुंबईतील शाळा , महाविद्यालये बंद ठेवली होती. मात्र हवामान खात्याचा 'रेड अलर्ट ' चा इशारा हवेत विरला.

त्यामुळे मुंबईकर आणि मुंबईत नोकरी, रोजगार, कामाधंद्यासाठी येणारे मुंबई बाहेरील नागरिक आज काहीसे दचकत, गोंधळलेल्या स्थितीत पावसाचा अंदाज घेत घराबाहेर पडले. सुदैवाने आज दिवसभरात अपेक्षित जोरदार पाऊस न पडल्याने मुंबईकरांनी सायंकाळी घराकडे निघताना हुश्श म्हणत सुटकेचा निःश्वास सोडला.

बुधवारी विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप, विद्याविहार, चुनाभट्टी, कुर्ला आदी रेल्वे स्थानकात, रेल्वे मार्गावर पाणी साचल्याने मध्य रेल्वेची वाहतूक चार तास तर हार्बर रेल्वे मार्गावरील वाहतूक अडीच - तीन तास ठप्प झाली होती. त्यामुळे मुंबईकरांचे आणि मुंबई बाहेरून कामासाठी मुंबईत येणाऱ्या नागरिकांचे चांगलेच हाल झाले होते. एक तासाच्या प्रवासासाठी तब्बल चार तास रखडावे लागले होते.

महिला, तरुणी यांची तर फारच बिकट अवस्था झाली होती. हजारो प्रवाशांना सीएसएमटी रेल्वे स्थानक ते घरी ट्रेनने जाण्यासाठी चार चार तास लटकांतीला सामोरे जावे लागले. तसेच, या अडचणीच्या वेळी काही रिक्षा, टॅक्सी चालकांनी रात्रीच्या वेळी अडलेल्या प्रवाशांकडून जास्त भाडे आकारून त्यांची लूट केल्याचे समजते.

दरम्यान, हवामान खात्याने गुरुवारी मुंबईत अतिवृष्टीचा इशारा दिला होता. मात्र सकाळपासून मुंबईत हलक्या सरी कोसळल्या. अपेक्षित अतिवृष्टी झाली नाही. आज दिवसभर पावसाच्या हलक्या सरी सायंकाळच्या सुमारास पडल्याने सीएसएमटी आणि चर्चगेट, दादर रेल्वे स्थानकात गर्दी करणाऱ्या प्रवाशांनी आपल्या छत्र्या म्यान केल्या.

# पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गांच्या सेवा रस्त्यांच्या सुधारणेसाठी पालिका करणार 1591 कोटींचा खर्च

■ मुंबई

मुंबई महापालिका हद्दीत पश्चिम द्रुतगती महामार्ग तसेच पूर्व द्रुतगती महामार्गाच्या सेवा रस्त्यांच्या ( सर्व्हिस रोड) सुधारणेसाठी महानगरपालिका तब्बल १५९१ कोटी ३५ लाख रुपये खर्च करणार आहे. या दोन्ही द्रुतगती महामार्गांच्या सिमेंट कॉंक्रिट पॅसेजमधील सर्व्हिस रोड, स्लीप रोड तसेच जंक्शन यांच्यात सुधारणा केली जाणार आहे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेने निविदा मागविली आहे. मंगळवारी ही निविदा प्रक्रिया सुरू केली असून तब्बल १५९१ कोटी ३५ लाख रुपये अंदाजित खर्चाची कामे काढण्यात आली आहेत. महापालिकेच्या रस्ते विभागाच्या प्रमुख अभियंत्यांनी ही निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई शहर तसेच उपनगरात रस्त्यांचा दर्जा सुधारावा तसेच खड्डे आणि खराब रस्त्यांबाबतच्या तक्रारी कमी करण्यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व प्रमुख रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या कामांना मोठ्या प्रमाणावर सुरुवात झालेला आहे. पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्त्यांच्या तसेच जोडस्थळांच्या दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून पूर्व बोलीची तारीख १ ऑक्टोंबर आहे. निविदा अर्जांच्या विक्रीची अंतिम मुदत १७ ऑक्टोबर ही आहे. महापालिकेला प्राप्त होणार्या निविदा या १८ तारखेला उघडल्या जाणार आहेत.



याशिवाय पालिका हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे आणि चर बुजविण्याच्या कामांसह विविध रस्त्यांच्या प्रकल्पांच्या कामांचे एकत्रिकरण आणि व्यवस्थापन करण्यासाठी डेटा ॲनालायटिक्स सर्व्हिसेस अर्थात माहिती विश्लेषण सेवा प्रदान करणे, त्यांच्या नोंदी तयार करणे, त्यांचे विविध स्वरुपात सादरीकरण या कामासाठीसुद्धा निविदा मागविण्यात आली आहे. पालिकेच्या मुख्य अभियंता, रस्ते आणि वाहतूक या विभागाने ही निविदा मागवली आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च हा एक कोटी १४ लाख रुपये इतका आहे.

# संजय राऊतांना अब्रूनुकसानीच्या खटल्यात जामीन मंजूर

## कोर्टाने ठोठावली 15 दिवसांची कैद, 25 हजारांचा दंड

प्रतिनिधी
■ मुंबई

मेधा किरीट सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रूनुकसानीच्या खटल्यात माझगाव न्यायालयाने ठाकरे शिवसेनेचा खासदार संजय राऊत यांना 15 दिवसांची कैद व 25 हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली आहे. या निर्णयामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. दरम्यान, न्यायालयाने संजय राऊत यांना जामीनही मंजूर केला आहे. त्यांना वरच्या कोर्टात अपिल करण्यासाठी कोर्टाने 30 दिवसांचा अवधी दिला आहे.

शौचालय प्रकरणात संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांचे नाव घेत आरोप केले होते. त्यानंतर त्यांनी राऊत यांच्यावर अब्रूनुकसानीचा दावा केला होता. संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांना मीरा-भाइंदरमध्ये मिळालेल्या शौचालयात कामात गैरव्यवहार केला असल्याचा आरोप केला होता. मागील दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात सुरू होते. त्यावर आता न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

संजय राऊत यांनी केलेल्या आरोपाचे पुरावे द्यावे, अशी मागणी मेधा सोमय्या यांनी आपल्या याचिकेत केली होती. या प्रकरणात न्यायालयाने आता आपला निकाल दिला असून संजय राऊत यांना 15 दिवसांच्या कैदेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच त्यांना 25 हजारांचा दंड देखील करण्यात आला आहे.

---

**ॲक्सिस फायनान्स लिमिटेड**
AXIS FINANCE
(सीआयएन: यू६५९२१एमएच१९९५पीएलसी२१२६७५)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनलसेंटर,
पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई ४०००२५

**ई-जाहीर लिलाव वजा विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) वाचल्या जाणाऱ्या तरतूदीसह सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सूचना ह्याद्वारे सर्व सामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार/ गहाणदार म्हणजेच १) साहेब जगन्नाथ सिंग (कर्जदार/ गहाणदार) २. मनप्रीत कौर (सह-कर्जदार), (ह्यानंतर नमूद कर्जदार असा संदर्भ असलेले) ह्याना देण्यात येत आहे की खाली वर्णन करण्यात आलेली स्थावर मालमत्ता ॲक्सिस फायनांस लिमिटेड म्हणजेच सुरक्षित धनकोकडे गहाण ठेवण्यात आली होती ज्याचा प्रत्यक्ष ताबा ॲक्सिस फायनांस लिमिटेड म्हणजेच सुरक्षित धनकोचे प्राधिकृत अधिकारी ह्यांनी घेतला असून ०५ सप्टेंबर २०२४ अनुसार रु. २०,६४०,७०७/- (रुपये दोन कोटी सहा लक्ष चाळीस हजार सातशे सात मात्र) (मागणी सूचना दिनांकित १२ जून २०२३ अनुसार ओ/ एस) कर्जदार/ गहाणदार/ हमीदार ह्यांच्याकडून त्यावरील भरणा होई पर्यंत/ वसुली होई पर्यंतचे करारामधील दरानुसार व्याजासह कसूर/ दंड व्याज आणि अन्य शुकाच्या वसुलीसाठी जे आहे जसे आहे , जे आहे जेथे आहे, जसे आहे तसे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय ह्या तत्वावर खालील प्रमाणे विक्री करण्यात येणार आहे. मालमत्तेचे वर्णन राखीव मूल्य (आरपी), इसारा रक्कम ठेव (इरठे) आणि विक्रीचा तपशिल खालील प्रमाणे:

**परिशिष्ट I**

| स्थावर सुरक्षित मालमत्तेचे वर्णन |
|---|
| **गाव वर्सोवा, ता. अंधेरी आणि जिल्हा मुंबई महाराष्ट्र ४०००५३ येथील क्लस्टर प्लॉट क्र. एडी-२१, आरएससी-२१, सीटीएस क्र. १३७४/बी (पार्ट), सर्वे क्र. १२० (पीटी) चा सर्व खंड आणि भूखंडावरील "वर्सोवा अंधेरी तपस्या" नावाच्या इमारतीच्या २२ व्या मजल्यावरील ७०८ चौ. फू. चटई क्षेत्र जे ८५० चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळाशी समतुल्य असलेल्या सदनिकेचा धारण केलेला क्र. २२०४ चा सर्व खंड आणि भूखंड.** |

**परिशिष्ट II**
**ई-लिलाव तपशिल**

| मालमत्तेचे वर्णन | परिशिष्ट I नुसार |
|---|---|
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | १६.१०.२०२४ रोजी वेळ: प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह स. ११.०० वा. पासून दु. १२.०० वा. पर्यंत |
| बोली सादरी कारणासाठी दिनांक आणि वेळ : | १४.१०.२०२४ रोजी सायं ४.०० वा. पूर्वी |
| राखीव मूल्य: २,२७,४८,०००/- (रुपये दोन कोटी सत्तावीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार मात्र) * ज्याच्या खाली सदनिका/ मालमत्तेची विक्री केली जाणार नाही. | |
| इसारा रक्कम ठेव (आरपी च्या १०%) : रु. २२,७४,८००/- (रुपये बावीस लक्ष चोऱ्याहत्तर हजार आठशे मात्र) | |
| बोली वाढ रक्कम: रु. १,००,०००/- (रुपये एक लक्ष मात्र) | |
| संपर्क व्यक्ती आणि मोबाईल क्र. : | श्री स्वप्नील तिवारी ९८२००६३२०८ आणि श्री आदित्य व्यास ७२७६७८७९९० |

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया https://www.axisbank.com/auction-notices आणि/ किंवा https://axisbank.auctiontiger.net वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत ३० दिवसांची संवैधानिक विकी सूचना.**

**कर्जदार/ गहाणदार/ हमीदार ह्यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६)/ नियम ९ (१) अंतर्गत नमूद कर्जासाठी वर नमूद दिनाकाला होणाऱ्या ई-लिलाव विक्रीची सूचना असल्याचे देखील समजावे.**

दिनांक: २६ सप्टेंबर २०२४,
ठिकाण: मुंबई,

प्राधिकृत अधिकारी,
प्राधिकृत अधिकारी,

---

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग,**
**पनवेल पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०
कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ६१ (ई-निविदा) सन २०२३-२४

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे ( दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २६/०९/२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./ सा.बां./पनवेल/ ५५४८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक : २३/०९/२०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी३४६६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

---

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## बोली मागविणारी सूचना

**तीन वर्षांच्या कालावधीसाठी बामणडोंगरी रेल्वे स्थानक येथे तरतूद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्यांचे प्रचालन आणि देखभाल.**

महाराष्ट्राची सिडको लिमिटेड ई-निविदाकरण प्रक्रीयेद्वारे "ऑन लाईन" नग दर शतमान निविदा अनिवार्य पात्रता निकषांची पूर्तता करणारे परवानाधारक विद्युत कंत्राटदार, सिडको लिमिटेडमध्ये वर्ग 'ए' मध्ये किंवा केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकार आणि त्यांच्या उपक्रमांमध्ये विद्युत नोंदणीकरणाच्या योग्य वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या ज्यांनी खाली नमूद कामासाठी तस्तम स्वरूपाचे काम पूर्ण केले आहे त्यांच्याकडून मागविण्यात येत आहेत:

१. कामाचे नाव: तीन वर्षांच्या कालावधीसाठी बामणडोंगरी रेल्वे स्थानक येथे तरतूद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्यांचे प्रचालन आणि देखभाल. २. सी. ए. क्र. १८/सिडको/ईई (इले-आरपी)/२०२४-२५ ३. अंदाजे मूल्य: रु. ८४,३४,८६०.०० (जीएसटी वगळता) ४. इरठे : रु. ८४,४००.०० ५. नोंदणीकरण वर्ग: ए (विद्युत) ६. पूर्तता कालावधी: १०९५ (एक हजार पंच्याणव) दिवस (पावसाळ्यासह) ७. निविदा प्रक्रिया शुल्क: रु. ५,९००/- (रुपये पाच हजार नऊशे मात्र) (ना-परतावा) (१८% जीएसटीसह) (५०००/- बोली शुल्क + १८% जीएसटी करीता रु. ९००/-)

बोलीकरण कार्यक्रमासह बोली कागदपत्रे https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर ३०/०९/२०२४ रोजी १७.०१ वा. पासून उपलब्ध असतील.

**अधीक्षक अभियंता**
**(इले-प्रकल्प)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२५२/२०२४-२५

---

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०२
दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२०५४२.३५ ई मेल: rreec3mhada@gmail.com

## ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२ रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई-४०० ००२ या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे उप जिल्हानिबंधक / मुंबई उपनगरे जिल्हा (शहर) यांचेकडे नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था / सोसायटी कडून योग्य त्या प्रणालीसाठी ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (रुपये) | सुरक्षा अनामत रक्कम (रुपये) (५० टक्के प्रथम व ५० टक्के देयकातून) | निविदा शुल्क (१२% जीएसटी) | काम पुर्ण करण्याचा कालावधी (पावसाळया सहीत) | ठेकेदारांची मजुर सहकारी संस्था नोंदणी वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "समता- ए विंग, श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु. ४९,८१,९२३/- | रु.५०,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "समता- बी विंग", श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु.४९, ९२,९४५/- | रु.५०,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ३. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "समता- सी विंग", श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु. ४९,८४,८१९/- | रु.५०,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "समता-डी विंग", श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु. ४९,६६,८८७/- | रु.५०,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "सागर", श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु. ३८,१६,५५४/- | रु.३९,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ६. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "परिश्रम", श्रीकांत पालेकर मार्ग, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु.४८,०५, २१९/- | रु.४९,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ७. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी.एम.जी.पी. इमारत "ए. पी. मार्केट- ए विंग ", मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु.४९, ४२, २२२/- | रु.५०,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |
| ८. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पी. एम. जी. पी. इमारत "ए, पी, मार्केट-बी विंग", मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत. | रु.४४,०५,०८१/- | रु.४५,०००/- | रु. ५९०/- | १८ महिने | वर्ग-अ |

१. सदर निविदा २ मोहरबंद लिफाफा पध्दीने ऑनलाईन मागविण्यात येत आहे. तसेच सदर निविदांबाबतचा पुढील पत्रव्यवहार हा http://mhada.gaharashtrongov.in आणि http://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवरच प्रसिध्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.
२. सर्व पात्र / इच्छुक कंत्राटदारांना निविदा संबंधित दस्तऐवज वेबसाईट http://mahatenders.gov.in यावर पाहून डाऊनलोड / अपलोड करता येईल. (दिनांक- २७/०९/२०२४ सकाळी १०.०५ वाजल्यापासुन ते दिनांक- ०४/१०/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत).
३. निविदा अर्जाची रक्कम आणि अनामत रक्कमेचा भरणा ऑनलाईन पध्दतीनेच करावा.
४. तांत्रिक निविदा दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता तसेच आर्थिक बोलीबाबतची निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता, कार्यकारी अभियंता (सी-३ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०-१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई - ४०० ००२ यांचे दालनात वेबसाईट http://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.
५. तांत्रिक निविदा उपडतेवेळी कंत्राटदाराने निविदा अपलोड करतांना सादर केलेल्या मुळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.
६. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र लागू असल्यास रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले मूळ प्रतित सादर करावे. सदर मूळ प्रतिज्ञापत्र निविदा सूचना कालावधिमधील असणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर मूळ प्रतिज्ञापत्रा मध्ये निविदाकाराने स्वतः :चे नाव, कंपनीचे नाव व सोबत ज्या इमारतीच्या कामाची निविदा भरणार आहे त्या इमारतीचे नाव व निविदा बोली क्रमांक नमूद करणे अत्यावश्यक आहे. सर्व निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.
७. निविदाकाराने अपलोड करावयाची माहिती पीडीएफ फॉरमॅटमध्येच अपलोड करावी.
८. कंत्राटदाराकडे प्राधिकृत संस्थेकडून प्राप्त केलेले विहित नोंदणी वर्गातील डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे.
९. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिका-यांकडे ठेवण्यात येत आहे.
१०. कंत्राटदारांना जी.एस.टी. नोंदणी अनिवार्य राहिल.
११. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा कमी न्युनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करुन अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी. दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यानी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय 'जर प्रथम न्युनतम देकाराच्या दरापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा.
१२. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या प्रचलित एसएसआरवर आधारीत असून, त्यामध्ये जी. एस. टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. ची अदायगी स्विकृती करारनामा मुल्यावर होईल.
१३. सविस्तर निविदा सुचना http://mhada.maharashtra.gov.in आणि http://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. निविदेसंबंधी कागदपत्रे व ऑनलाईन निविदा सादर करणेबाबत आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याकरीता वेबसाईट http://mahatenders.gov.in वर संपर्क साधावा.


निविदेबाबत शंका निरसनार्थं महाराष्ट्र पोर्टल यांना संपर्क साधावा.
दुरध्वनी क्रमांक १८००३०७०२२३२
भ्रमणध्वनी क्रमांक +९१-७८७८००७९७२ व +९१-७८७८००७९७३.

**CPRO/A/767**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता [सी-३ विभाग),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

तुमचा स्वभाव लोकांमध्ये विश्वास निर्माण करतो, तुमची संपत्ती नाही



- ॲरिस्टोटल
प्रसिद्ध तत्त्ववेत्ता

वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४

# चकमक चांगली वाटत असली तरी...

आपल्याकडील न्याय व्यवस्था आणि त्यामधून मिळणारा विलंबित निकाल यामुळे अनेकजण कातावले असल्याने भले ही फेक चकमक असो तरीही त्या मुलीला न्याय मिळाला अशी सर्वसामान्यांची भावना असून ती नाकारून चालणार नाही. आता बदलापूर प्रकरणातील चकमक प्रकरणावरून राजकारण तापले असले तरी सामान्य जनतेचा सुर हा फारच आश्वासक वाटत असल्याचे चित्र दिसते. एकीकडे ही भावना रुजत असताना न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून न्याय दान झाले पाहिजे असा मानणारा सुद्धा मोठा वर्ग असल्याने एकूणच या चकमक प्रकरणाचा राजकीय अध्याय पुढील काही काळात गाजणार आहे. या निमित्ताने पोलिसांच्या ताब्यात असणाऱ्या संशयित आरोपींचा मृत्यू हा मुद्दा पुन्हा नव्याने उफाळून आला आहे. एका माहितीनुसार गेल्या काही काळात पोलीस कोठडीत संशयित आरोपींचे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसत आहे. गेल्या पाच वर्षांत देशभरात पोलीस कोठडीत मृत्यूची एकूण किमान ७०० प्रकरणे नोंदवण्यात आली असून यंदा त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे सर्वाधिक मृत्यू हे गुजरात व महाराष्ट्रात झाले आहेत. या मृत्यू ची अनेक ठिकाणी चौकशी सुरू असली तरी न्याय कोणाला मिळाला हा प्रश्न कायमच कायम राहिला आहे. गेल्या २० वर्षात देशभरात दोन हजार जणांचा कोठडीत मृत्यू झाला आहे. याप्रकरणी ८९३ पोलिस कर्मचार्यांवर गुन्हे नोंदवण्यात आले आणि ३५८ कर्मचार्यांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले. पण या कालावधीत केवळ २६ पोलिसांना दोषी ठरवण्यात आल्याची माहिती आहे. एका आकडेवारीनुसार, गेल्या दोन वर्षात ७६ कोठडीतील मृत्यूची नोंद झाली असून, गुजरातमध्ये सर्वाधिक १५ मृत्यू झाले आहेत. आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्येही कोठडीत मृत्यू झाले आहेत. आतापर्यंत पोलिसांच्या कोठडीत आरोपींच्या संशयास्पद मृत्यूची अनेक प्रकरण घडली आहेत. मुंबई पोलीस दलाच्या इतिहासात ख्वाजा युनूस प्रकरण फार गाजले होते. याप्रकरणीचार पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. युनुसला पोलीस कोठडीत बेदम मारहाण करण्यात आली होती. ख्वाजा युनुसच्या साथीदाराने केलेल्या दाव्याच्या आधारे न्यायालयाने या घटनेचा तपास सीआयडीकडे सोपविला. तसेच सचिन वाझे यांनी युनुस प्रकरणात खोटी आणि संशयास्पद तक्रार दाखल केल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणात पुरावे नष्ट करणे आणि खुनाच्या आरोपाखाली सचिन वाझे यांच्यासह चार पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशा अनेक घटना कायम घडत असतात. याबरोबरच खोटी चकमक आणि त्यात आरोपीचा मृत्यू यावरून देशभरात अनेक वेळा संशय व्यक्त झालेला आहे. आताच्या बदलापूर प्रकरणातील आरोपीचा मृत्यू या अशा घटनेत झाल्याने पुन्हा एकदा हा मुद्दा सुद्धा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी सुद्धा उत्तर प्रदेशातील कुख्यात गुंड म्हणून ओळखल्या जाणार्या विकास दुबे हा पोलिस एन्काऊंटरमध्ये मारला गेला होता. अशा निर्वावलेल्या, बाहुबली गुंडाच्या मरणाने कुणालाही वाईट वाटण्याचे कारण नाही; परंतु ज्या परिस्थितीत हे एन्काऊंटर घडत आहेत आणि पोलिस ज्यापद्धतीने त्याला रंगमुलामा देत आहेत ते चिंताजनक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या एन्काऊंटरबाबत समाजातून व्यक्त होणारे समाधान, काही प्रसंगी आनंदोत्सव साजरा करणे या गोष्टी समाजाचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कमी होत चालल्याचे द्योतक म्हणावे लागेल. झटपट न्याय देण्याची ही पद्धत चांगली वाटत असली तरी त्याची दुसरी बाजू सुद्धा तेवढीच भयानक आहे ही बाब विसरून चालणार नाही. गेल्या वर्षी हैदराबादमध्ये घडलेल्या सामूहिक बलात्काराच्या प्रकरणातील आरोपींचे एन्काऊंटर झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घेत एक चौकशी समिती नेमली होती. या समितीचा अहवाल येणे अद्याप बाकी आहे. तोवरच हे एन्काऊंटर घडले आहे. अशा गुन्हेगारांच्या विरुद्ध साक्षीदार पुढे येत नाहीत. परिणामी ते मोकाट सुटतात. त्यांचे गुन्हेगारी साम्राज्य वाढत जाते तसतसे त्यांची आर्थिक ताकद वाढत जाते. पुढे जाऊन राजकीय पक्ष अशा गुन्हेगारांचा उपयोग करुन घेतात. निवडणुकीच्या रिंगणात त्यांना उतरवून, निवडून आणून त्यांना पवित्र करण्याचा प्रयत्न केला जातो. परिणामी, त्यांची अप्रतिष्ठा झाकली जाऊन त्यांची इमेज लार्जर दॅन लाईफ बनते. या गुंडांना मग आपण प्रतिसरकार आहोत असे वाटू लागते. काही वेळेला पोलिस यंत्रणेकडून त्यांना पोसले जाते ही वास्तवता. साधारण पणे ९० च्या दशकात मुंबईमध्येही अशा प्रकारे अनेक अंडरवर्ल्ड गुंडांचे एन्काऊंटर मोठ्या प्रमाणात झाले होते. त्यानंतर विशिष्ट पोलिस अधिकारी काही गुंडांच्या गँगतर्फे काम करतात असे आरोप झाले होते. काही पोलिस अधिकारी एन्काऊंटर स्पेशालिस्ट म्हणून प्रसिद्ध पावले. परंतु पुढे याला लगाम घालण्यात आला. कारण न्यायालयाच्या माध्यमातून जर गुन्हेगाराला शिक्षा ठोठावण्यात आली तर न्यायालयांचे पावित्र्य तर वाढतेच; परंतु सामान्य नागरिकाच्या मनात एक प्रकारची सुरक्षितता वाढते. गेल्या काही वर्षांपासून मुंबईत एन्काऊंटर झाले नाहीत. कारण अशा एन्काऊंटर ला न्यायालयाकडून चाप लावण्यात आला. त्यांची कठोर चौकशी सुरु झाली. तथापि, एन्काऊंटर झाल्यानंतर ते खरोखरीच पोलिसांनी स्वबचावासाठी केलेले होते का की ती बनावट चकमक होती, याची सखोल चौकशी होऊन त्यातील सत्यासत्यता निकालाद्वारे न्यायालयांनी तात्काळ समाजासमोर आणली पाहिजे. याला एक-दोन महिन्यांची कालमर्यादा असली पाहिजे. असे झाले नाही तर अशा गुंडापुंडांचा नायनाट झाल्याविषयी समाजात आनंद साजरा होणे हे स्वाभाविक आहे. पण ते सदृढ़ लोकशाहीसाठी योग्य नाही. किंबहुना, कायद्यापुढे आणि न्यायव्यवस्थेपुढे ते एक आव्हान आहे. आमचा कायदा अपंग झाला आहे आणि कायद्यावरचा लोकांचा विश्वास उडाला आहे, पोलिसच चांगला न्याय देऊ शकतात ही गोष्ट अत्यंत चिंतेची आहे. गुन्हा शाबित होण्यापूर्वी पोलिस यंत्रणाच जर आरोपींवर कारवाई करु लागली तर मात्र सरकार आणि न्यायव्यवस्थेला गंभीरपणाने दखल घ्यावी लागेल. म्हणूनच, घडलेली चकमक खरी की खोटी याबाबतचे संशयाचे धुके दूर व्हायला हवे. खरोखरच एन्काऊंटर घडले असेल तर पोलिसांना सन्मानाने क्लीन चिट दिली गेली पाहिजे. याउलट चकमक बनावट असेल तर संबंधितांना कठोर दंडही केला गेला पाहिजे. तसेच हे एन्काऊंटर कोणाच्या सांगण्यावरुन केले याचाही उलगडा झाला पाहिजे. कारण आपल्याविरुद्धची अनेक गुपिते या गुंडांमार्फत बाहेर येऊ नयेत अशी इच्छा धरणार्या काही व्यक्ती समाजात, सत्तेत आहेत का, याचाही शोध घेणे आवश्यक आहे. या सर्वांतील सत्य पारदर्शकपणाने समोर आले तरच लोकांचा न्याय प्रक्रियेवरील विश्वास वाढेल. अन्यथा, आम्ही काहीही करु शकतो अशी पोलिसांची मानसिकता बनेल. त्यामुळे कायद्याने स्थापित केलेले राज्य ही संकल्पना दृढ होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. एकूणच बदला पूर्ण होऊन न्याय मिळाला असे एकीकडे वाटत असले तरी लोकशाही मधील सर्वोच्च असलेल्या न्याय व्यवस्थेबाबत सुद्धा लोकांच्या मनात कायम आदर हा राहिला पाहिजे. अन्यथा खोट्या अथवा खऱ्या चकमकी मध्ये समाज कायमचा हरवून जाण्याचा मोठा धोका आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदेचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला आणि समाजमनात या घटनेचे समिश्र स्वागत करण्यात आले असले तरी एकदाचा न्याय झाला अशी सुप्त भावना सुद्धा व्यक्त होत आहे. पण अशी चकमक चांगली वाटत असली तरी तिच्या अडून नको त्या चकमकी देखील पोलिसांकडून घडविल्या जाऊ शकतील याचाही धोका आहे.

# नको चिंता उपचाराच्या खर्चाची.. मदत आहे शासनाची..!

**राज्य शासनाने जनसामान्यांचे आरोग्य जपण्याला प्रथम प्राधान्य दिले आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहे. या निर्णयांमध्ये उपचाराचा खर्च न पेलणाऱ्या नागरिकांना केंद्रीभूत केले आहे. यामुळे जनसामान्यांना दिलासा मिळाला आहे. याशिवाय नियमित आरोग्य तपासणी करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. समाजातील प्रत्येक घटकाची आरोग्य तपासणी करण्यासाठी अभियान शासन राबवित आहे. राज्याची महत्त्वाची योजना असलेल्या 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्याचे' प्रति कुटुंब वार्षिक मर्यादा वाढविण्यात आली आहे. या निर्णयांमुळे आज कुठलाही मोठा आजार झाल्यास उपचार करण्याची चिंता नाही.**

**महात्मा** ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे विमा संरक्षण दीड लाखांहून 5 लाख रूपये करण्यात आले आहे. सर्वसामान्यांना खासगी दवाखान्यातील लाख रुपयांची बिले अदा करण्यापेक्षा योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंत उपचार मिळत आहे. तालुका स्तरावरील रूग्णालयेही आता या योजनेचा लाभ रूग्णांना देत आहेत. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेतंर्गत लाखो रूग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कर्नाटक सीमा भागात 865 गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. या भागातील गरजू रूग्णांना योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात येत आहे. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया याचा लाभही अडीच लाखांवरून चार लाखांपर्यंत नेण्यात आला आहे. त्यामुळे यासंदर्भात जे कोणी लाभ घेऊ इच्छित असतील किंवा जे प्रतीक्षेत आहेत, त्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक घरात 'माता सुरक्षित – तर घर सुरक्षित' ही अभिनव मोहिम राबविली. या मोहिमेदरम्यान महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता तसेच औषधांसाठी प्रति जिल्हा 2 कोटी रूपयांचा निधी देण्यात आला. या मोहिमेतून दुर्धर आजारांचे निदान झालेल्या महिलांना उपचारासाठी मदत करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात आली. विविध आजाराशी संबंधित तज्ज्ञांचेदेखील सहकार्य घेण्यात आले.

आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेवक यांच्यामार्फत घरोघरी जाऊन उपलब्ध सुविधेबाबत माहिती देण्यात येतो. महिलांमधील कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान नाक घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन करण्यात आले. राज्यात ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांची आरोग्य तपासणी तसेच दुसऱ्या टप्प्यात ३ लाख १३ हजार ९६५ गर्भवती मातांवर उपचार करण्यात आले आहेत.

राज्यभरात 0 ते 18 वर्षांपर्यंतची बालके, किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे 1800 शाळांमधील 18 वर्षांखालील जवळपास २ कोटी ४९ लाख ५४ हजार २५७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. राज्यात 9 हजार तपासणी पथकांमार्फत ही अभिनव योजना राबविली आहे.

मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राज्यभर राबविण्यात आले. ही तपासणी शासकीय निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, खाजगी शाळा, आश्रमशाळा, अंध शाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाडया, खाजगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधार गृहे, अनाथ आश्रम, समाज कल्याण व आदिवासी विभाग वसतीगृहे या ठिकाणी करण्यात आली. महिला, बालकांसोबतच पुरूषांचीसुद्धा सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' ही मोहिम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे ३ कोटीपेक्षा अधिक पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

या विभागाचा जनमानसात लोकप्रिय आणि कल्याणकारी निर्णय म्हणजे 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' होय. या निर्णयामुळे आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट झाले. सामान्य नागरिकांना अगदी सहज आरोग्य सुविधा मिळू लागल्या. गल्ली बोळात हे दवाखाने सुरू झाल्यामुळे हाकेच्या अंतरावर आरोग्य सुविधांची उपलब्धता झाली. सुरूवातीला मुंबई शहरात सुरू केलेल्या दवाखान्यांना वाढता प्रतिसाद बघता राज्यभरात दवाखाने सुरू करण्यात आले असून राज्यात 347 'आपला दवाखाना' सुरु आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी 15 ऑगस्ट 2023 पासून करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रूग्णालयांमधील बाह्य रूग्ण विभागातील रूग्णांची नोंदणी दुपटीने, तर काही ठिकाणी तिपटीने वाढली आहे.

हृदयरोग रुग्णांसाठी राज्यामध्ये सर्व सुविधांची उपलब्धता शासकीय रूग्णालयांमध्ये करण्यात येत आहे. हृदय रोगींसाठी राज्यात 12 ठिकाणी कॅथलॅबची सुविधा देण्यात आली आहे. ही सुविधा आता संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच 17 ठिकाणी एमआरआयची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे व कोल्हापूर जिल्ह्यातील उदेगांव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यात येणार आहे. हे रूग्णालय 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्युरोसायन्सेस' च्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरूग्णालय असणार आहे. यामध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे. वृद्धांना मोतीबिंदूची समस्या मोठ्या प्रमाणावर येते. राज्य शासनाने 'मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान' राबविले. या अभियानातून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सध्या लाखांच्यावर शस्त्रक्रीया करण्यात आल्या आहेत.

सध्या विविध कर्करोगांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये स्तन, गर्भपिशवीच्या मुखाचा, मुख कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. कर्करोगावरील उपचार खूप खर्चिक आहे. शासनाने कर्करोग रूग्णांना उपचार सुलभ व्हावे, यासाठी 34 जिल्ह्यांमध्ये जिल्हा रूग्णालयात 'केमोथेरपी डे केअर' केंद्राची सुविधा दिली आहे. शासनाच्या सुविधांमुळे कर्करूग्णांवर उपचार मिळणे सोयीचे होणार आहे. तसेच कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी 8 मोबाईल कॅन्सर डायग्नोस्टिकची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. कर्करूग्णांच्या शोधासाठी आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करोगी शोधले जात आहेत. संशयित रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

मुत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त असलेल्या रूग्णांसाठी 234 तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डायलिसीस सेवा, हिमोफिलीयाग्रस्त रूग्णांसाठी प्रत्येक जिल्हा रूग्णालयात 'हिमोफिलिया डे' केअर केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी 'वात्सल्य' ही विशेष योजना राबविण्यात येत आहे. कमी वजनाच्या बालकांच्या जन्माचे प्रमाण आणि जन्मजात व्यंग असलेल्या बालकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात माहेरघर योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह 1 हजार 756 ॲम्बुलन्स खरेदीचा निर्णयही घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद गतीने उपचार मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिका उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या 36 ठिकाणी उपलब्ध शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून 352 ठिकाणी लवकरच ही सेवा देण्यात येणार आहे. अशाप्रकारे राज्य शासनाने जनसामान्यांच्या उपचाराची काळजी घेण्यासाठी विविध निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी केली आहे.

**– नीलेश तायडे,** विभागीय संपर्क अधिकारी

# मध्य रेल्वे: भारतीय पर्यटन आणि सांस्कृतिक वारशात ऐतिहासिक योगदान

**भारतीय** रेल्वेच्या इतिहासात आणि विकासात मध्य रेल्वेचे महत्त्वाचे योगदान आहे. वर्ष १९५१ मध्ये भारतीय रेल्वेच्या पुनर्रचने दरम्यान याची स्थापना करण्यात आली. मुंबई, पुणे, नागपूर, भुसावळ आणि सोलापूर ही प्रमुख शहरे या झोनमध्ये येतात. यासोबतच भारतातील महत्त्वाची पर्यटन स्थळे जोडण्याचे कामही मध्य रेल्वे करते.

पर्यटन क्षेत्रात भारतीय रेल्वेची भूमिका खूप महत्त्वाची आहे. हे केवळ प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत नाही तर पर्यटकांना भारतातील विविध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्थळांना भेट देण्याची संधी देखील देते. भारतीय रेल्वेच्या काही प्रमुख पर्यटन सेवांमध्ये "डेक्कन ओडिसी," "महाराजा एक्स्प्रेस," आणि "रामायण सर्किट ट्रेन" सारख्या पर्यटक विशेष गाड्यांचा समावेश होतो. या गाड्या प्रवाशांना शाही अनुभव देतात आणि ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाणे जोडतात.



मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातून निघणाऱ्या प्रमुख पर्यटक गाड्यांमध्ये महाराष्ट्र, गोवा आणि राजस्थानच्या ऐतिहासिक स्थळांना भेट देणाऱ्या "डेक्कन ओडिसी" चा समावेश होतो. शिवाय, नेरळ - माथेरान हिल रेल्वे, पश्चिम भारतातील एक अनोखी आणि ऐतिहासिक रेल्वे, प्रवाशांना महाराष्ट्रातील माथेरान हिल स्टेशनपर्यंत पोहोचवते. ही रेल्वे १९०७ मध्ये सुरू करण्यात आली होती. तिची लांबी सुमारे २१ किमी आहे आणि ती नेरळ ते माथेरान या मुंबईजवळील लोकप्रिय हिल स्टेशनपर्यंत जाते. ही रेल्वे नॅरोगेज ट्रॅकवर धावते आणि हिरवीगार जंगले, वळणदार दऱ्या आणि सुंदर पर्वतीय दृश्यांमधून पर्यटकांना घेऊन जाते. ट्रेनचा वेग कमी असल्याने प्रवाशांना नैसर्गिक सौंदर्याचा आनंद आरामात घेता येतो. माथेरान हिल रेल्वेवरील प्रवास हा पर्यटकांसाठी एक रोमांचक अनुभव आहे कारण तो घनदाट जंगले, उंच टेकड्या आणि अरुंद दऱ्यांतून जातो. या मार्गाला अंदाजे २२१ वक्र आहेत, त्यापैकी काही अत्यंत अरुंद आणि तीक्ष्ण आहेत. माथेरान हिल रेल्वे पर्यटनाच्या दृष्टिकोनातूनही खूप महत्त्वाची आहे. हे स्थानिक आणि परदेशी पर्यटकांना आकर्षित करते, जे शांत वातावरणात आणि निसर्गाच्या कुशीत काही वेळ घालवण्यासाठी येथे येतात. माथेरान हिल स्टेशन हे स्वतः एक पर्यावरण -संवेदनशील क्षेत्र आहे, जेथे मोटार वाहनांना बंदी आहे, शांत आणि प्रदूषणमुक्त वातावरण राखले जाते. माथेरान हिल रेल्वे हा भारतीय रेल्वेच्या वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि पर्यटकांना एक संस्मरणीय प्रवास अनुभव प्रदान करतो. ही रेल्वे केवळ माथेरानला नेरळशी जोडत नाही, तर लोकांना निसर्गाच्या जवळ आणते आणि भारताच्या रेल्वे संस्कृती आणि इतिहासात एक विशेष स्थान आहे. मध्य रेल्वेखालील लोणावळा आणि इगतपुरी ही स्थानकेही पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहेत, कारण इथून पर्यटक अनेक नैसर्गिक स्थळे आणि ट्रेकिंग मार्गांवर पोहोचू शकतात. जागतिक पर्यटन दिनानिमित्त भारतीय रेल्वेची ही भूमिका अधिक महत्त्वाची ठरते, कारण ती देशाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटकांना केवळ सुविधाच देत नाही तर भारताची संस्कृती, इतिहास आणि नैसर्गिक सौंदर्यही दाखवते.

**जनसंपर्क विभाग,
मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी
महाराज टर्मिनस, मुंबई**

## पत्र मानस

### हॉटेल चालकांची नावे दर्शनी भागात प्रसिद्धी सक्ती असावी

काही खाद्यपदार्थ विक्रेते अन्नात थुंकत असल्याच्या तसेच, लघवी मिसळत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल उत्तर प्रदेश सरकारने घेतली आहे. खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी यापुढे आपल्या दुकानांवर अथवा उपाहारगृहांवर मालकाचे, व्यवस्थापकाचे तसेच ते चालवणाऱ्यांचे नाव, पत्ता प्रदर्शित करणे अनिवार्य आहे, असे निर्देश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आदेश निर्गमित केले तश्याच प्रकारचे आदेश महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात आदेश निर्गमित करावेत . खाद्यपदार्थ तयार करणाऱ्यांनी तसेच, ते वाढणाऱ्यांनी मास्क , डोक्यात टोपी , हातात हॅन्ड ग्लोज वापरावेत, सर्व हॉटेल व रेस्टॉरंटमध्ये किचन सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज नागरिकांना दिसेल असे लावावे जेणेकरून किचन ची स्वछता आणि पारदर्शकता नागरिकांना दिसून येईल.खाद्यपदार्थांत थुंकी अथवा लघवी मिसळणे हा अतिशय किळसवाणा व आक्षेपार्ह प्रकार असून याप्रकारे अन्नाची विटंबना करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करून तो गुन्हा आजामीनपत्र केला पाहिजे. नुकतेच सहारनपूर जिल्ह्यातील एका हॉटेलमध्ये रोटी करणारा एक मुलगा त्यावर थुंकत असल्याचा व्हिडीओ १२ सप्टेंबर रोजी समोर आला होता. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी या हॉटेलच्या मालकास अटक केली होती. अन्न औषध प्रशासन , महापालिका आणि पोलीस यांनी संयुक्त पणे वरील होत असलेल्या गोष्टी वर आवर घालण्याबाबत प्रयत्न शील असावे.

**- श्री. नितीन कदम दादर मुंबई**

### 'पाणीटंचाई मुक्त वर्षाचा सुखद अनुभव यावा'

वर्तमानपत्रात वाचले 'पुढील वर्षी पाणीटंचाई मुक्त' असा दावा महापालिकेकडून केला जात आहे आणि खुप आनंद झाला. २०२५ च्या उन्हाळयात पाणी कपात नसणार याचा कोन आनंद झाला. महापालिकेच्या मालकीची तलाव ९८ ते ९९ टक्के, भातसा तलाव ९९ टक्के, नाशिकचा अप्पर वैतरणा तलाव तसेच मुंबईच्या नॅशनल पार्क मधील विहार व तुळशी तलाव पुर्ण भरला आहे. पण पाणीटंचाई मुक्त वर्षाचा हा सुखद धक्का फोल ठरु नये म्हणुन नागरिकांनी व महापालिकेने अतिशय काळजी घेणे तितकेच आवश्यक आहे. तलावातील पाण्याचे बाष्पीभवन कमीतकमी कसे होईल याकडे व नळमार्ग (पाईपलाईन) फुटणार नाही याकडे महापालिकेने लक्ष दिले पाहिजे. नागरिकांनी काटकसरीने पाण्याचा वापर केला पाहिजे. घरात नळातुन, नळमार्गा (पाईप) मधुन पाण्याची गळती होणार नाही याकडे सदैव लक्ष असले पहिजे. चला तर मग आपली कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडुन पुढील व येणार्या सर्व वर्षात पाणीटंचाई मुक्त वर्षांचा सुखद अनुभव घेऊया.

**- लीना वालावलकर, मुंबई**

### ईव्हीएम बद्दलचा जास्त संभ्रम नेते मंडळीना?

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वातावरण तयार होत असताना निवडणूक आयोगाकडून देखील ठिकठिकाणी ईव्हीएम कशाप्रकारे कार्य करते याची प्रात्यक्षिके मतदारांना दाखवून ईव्हीएम कार्यप्रणाली किती पारदर्शक तसेच विश्वासार्ह आहे, हे मतदारांना पटवून देण्यात येत आहे. मतदारांना सज्ञान करण्याच्या दृष्टिकोनातून जरी ईव्हीएमबद्दल माहिती देणे योग्य असले तरी, ईव्हीएमच्या पारदर्शकतेवर मतदारांनी कधीच प्रश्न उचला नाही, उलट तो हरल्यानंतर फक्त राजकीय नेत्यांना प्रश्न पडतो? त्यामुळे ईव्हीएमची प्रात्यक्षिके दाखविण्याची जास्त गरज मतदारांना आहे की राजकीय नेते मंडळीना? लोकसभा निवडणुकीत अनेक जुन्या मतदारांची नावे नवीन मतदार यादीतून गहाळ झाली होती त्यामुळे मतदानापासून अनेकांना वंचित राहावे लागले. तीच चूक विधानसभा निवडणूकीत होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाने त्यावर जास्त मेहनत घ्यावी असे मतदारांना वाटते. ईव्हीएम ही आधुनिक काळाची गरज असून, हे यंत्र नव्हे तर आपल्या मतांच बुलेटप्रूफ कवच आहे हे मतदारांना आधीच पटले असून ते सोयीप्रमाणे आपले हत्यार बनविणाऱ्या राजकीय नेत्यांना पटवून दिल्यास ईव्हीएम जनजागृती मोहीम फत्ते होईल.

**- नितीन प्रकाश पडते, ठाणे (प.)**

## एमआयडीसी परिसरात आढळलेल्या दुर्मिळ हरणाच्या शिकारीचा प्रयत्न

**अंबरनाथ:** अंबरनाथमध्ये पिसुरी जातीच्या दुर्मिळ हरणाच्या शिकारीचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. गोळ्या लागून जखमी अवस्थेत असलेले हरीण अंबरनाथ एमआयडीसी भागात आढळून आले होते. या नंतर त्याला उपचारांसाठी बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात दाखल करण्यात आलं आहे. पिसुरी जातीचं हे हरीण संरक्षित प्रजातीत मोडतं. रविवारी पहाटेच्या सुमारास अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसीतील एका कारखान्याजवळ हे हरीण एका कामगाराला जखमी अवस्थेत आढळून आले. याबाबत त्याने लागलीच प्राणीमित्र आणि वन विभागाला माहिती दिली. यानंतर त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेत हरणाला ताब्यात घेतलं. यावेळी हे हरिण गंभीर जखमी अवस्थेत असल्याने त्याला उपचारांसाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात दाखल करण्यात आलं.



## म ह त्त्वा चे

### डोंबिवलीत जातीय तेढ निर्माण करणाऱ्या दोनजणांविरुद्ध गुन्हा

**डोंबिवली:** कल्याण – दोन समाजात तेढ निर्माण होईल, असे दृश्यध्वनी चित्रफितीमधून वक्तव्य करणाऱ्या, तसेच, एका धर्माचा अपमान होईल अशा पद्धतीने ध्वनीचित्रफित बनवून समाजमाध्यमांत सामायिक करणाऱ्या डोंबिवलीजवळील निळजे लोढा हेवनमधील एक रहिवासी आणि एका कोळेगावातील व्यक्तीविरुद्ध मानपाडा पोलीस ठाण्यात पोलिसांच्या तक्रारीवरून मंगळवारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. योगेश कमलेश्वर पांडे असे गुन्हा दाखल व्यक्तीचे नाव आहे. ते निळजे लोढा हेवन येथे कुटुंबीयांसह राहतात. एका धर्माला उद्देशून त्या धर्माचा अपमान होईल अशा पद्धतीने योगेश यांनी दोन ध्वनीचित्रफिती तयार केल्या. त्या समाजमाध्यमांमध्ये सामायिक केल्या. या ध्वनीचित्रफितीमुळे समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याबद्दल मानपाडा पोलीस ठाण्याचे हवालदार प्रीतम काळे यांनी भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### माहेरहून 20 लाख आणले नाही म्हणून विवाहितेचा छळ

**डोंबिवली:** बकरी पालन व्यवसाय करण्यासाठी माहेरहून २० लाख रूपये आणत नाही म्हणून डोंबिवलीतील एका विवाहितेचा तिच्या सासरच्या सासू, सासरे आणि पती यांनी छळ केला असल्याची तक्रार विवाहितेने रामनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी दाखल केली आहे. पोलिसांनी या तक्रारीच्याअनुषंगाने गुन्हा दाखल केला आहे. मागील दोन वर्षापासून विवाहिता अक्षता यांना पती, सासु, सासरे आपल्याला बकरी पालनाचा व्यवसाय करायचा आहे. यासाठी तू तुझ्या माहेरहून २० लाख रूपये घेऊन ये म्हणून तगादा लावत होते. हे पैसे तक्रारदार महिला आणत नसल्याने सासरची मंडळी तिला शिवीगाळ, अपशब्द वापरून शारीरिक, मानसिक त्रास देत होते. मुला ऐवजी मुलीला जन्म दिला म्हणून तिला टोमणे मारण्यात येत होते. घरातील या सगळ्या प्रकाराची पोलीस ठाण्यात तक्रार केली तर पुन्हा सासरी नांदावयास आणणार नाही अशी धमकी सासरच्या मंडळींकडून तक्रारदार महिलेला देण्यात येत होती. सासरच्या मंडळींचा त्रास वाढू लागल्याने अखेर पीडितेने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. साहाय्यक पोलीस निरीक्षक कावळे तपास करत आहेत.

# बदलापूरला मालवणची पुनरावृत्ती?

## पुतळा उभारणीचा अनुभव नसलेल्या शिल्पकाराला काम दिल्याचा आव्हाडांचा आरोप

प्रतिनिधी
■ ठाणे

मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा काही दिवसांपूर्वीच कोसळला. त्यानंतर राज्यभरात मोठं राजकारण तापलं. पोलिसांनी दोघांना अटकही केली. पण अजूनही या घटनेचे पडसाद राज्यात उमटत आहेत. आता या घटनेची पुनरावृत्ती बदलापूरमध्येही होऊ शकते, अशी भीती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये घोटाळ्याचा आरोप केला आहे. बदलापूरला मालवणची पुनरावृत्ती? छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणी प्रकल्पात घोटाळा, असं शीर्षक देत आव्हाडांनी घोटाळ्याचा आरोप केला आहे. तसेच याबाबत



माहितीही दिली आहे. सगळ्यात कमी देकार (L-1) 63 लाख 13 हजार रुपये या राज एंटरप्राइजेस, ज्याचा अनुभव 28 वर्षे असून सुमारे 300 पुतळे उभारले आहेत, या शिल्पकाराला डावलले. आणि काम कोणाला दिले? जादा दराने निविदा भरली आहे, त्या कराहा स्टूडियोला, असा दावा आव्हाडांनी केला आहे.

निविदा रक्कम (L-2) 95 लाख 28 हजार 600 रुपये या शिल्पकाराचे वय आहे सुमारे 28 वर्षे. आणि एकही पुतळा उभारणीचा अनुभव नाही. पुन्हा 32 लाख 15 हजार 600 रुपये जास्त. पैसे कोणाच्या घश्यात?, असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, राजकोट येथील पुतळा उभारणीच्या कामातही घोटाळा झाल्याचा आरोप महाविकास आघाडीतील नेत्यांकडून केला जात आहे. मोठे पुतळे बनवण्याचा अनुभव नसलेल्या शिल्पकाराला काम दिल्याचा आरोपही या नेत्यांकडून केला जात आहे. शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाचे आमदार वैभव नाईक यांनीही आरोप केले आहे. आता त्यांना पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले आहे. घोटाळ्याचे पुरावे द्यावेत, असे पोलिसांनी त्यांना सांगितले आहे. आता बदलापूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या पुतळ्याच्या कामातही भ्रष्टाचाराचा आरोप आव्हाडांनी केला आहे.

## रेवस बँक व्यवस्थापक मारहाण प्रकरण

# आरोपीला तीन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा

प्रतिनिधी
■ अलिबाग

रेवस येथील बँक ऑफ इंडीयाच्या शाखा व्यवस्थापकाला मारहाण करणे, ग्राहकाला चांगलेच महागात पडले आहे. मारहाण प्रकरणी आरोपी सुरज परशुराम कोळी राहणार बोडणी, याला अलिबागच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली तसेच पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावला.

सदर घटना ही २२ मे २०२० रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली होती. अभिशेख गणेश वर्मा हे स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या रेवस शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. यावेळी आरोपी सुरज परशुराम कोळी हे बँकेत आले. त्यांनी कर्जाचा थकीत हप्ता बचत खात्यातून कट झाल्याचा राग मनात शाखा व्यवस्थापक यांना मारहाण केली आणि बँकेच्या कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला.

याबाबत मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आरोपी सुरज कोळी यांच्या विरोधात भादवी कलम ३३२, ३५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीसांनी तपास करून या आरोपी विरोधात अलिबाग येथील जिल्हा व सत्र न्यायालयात याबाबतचे दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर प्रकरणाची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस राजंदेकर यांच्या न्यायालयासमोर झाली. यावेळी शासकीय अभियोक्ता म्हणून स्मिता राजाराम धुमाळ पाटील यांनी काम पाहीले. सुनावणी दरम्यान एकूण १० जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. ज्यात फिर्यादी अभिषेक वर्मा, प्रत्यक्षदर्शी अगेंद्र कुमार ठाकूर, टेक्निशियन गिरीश घरत, तपासिक अंमलदार अतुल मडके यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर जिल्हा न्यायाधीश राजंदेकर यांनी शासकीय अभियोक्ता धुमाळ- पाटील यांचा युक्तीवाद ग्राह्य धरला आणि साक्षी पुरावे लक्षात घेऊन आरोपी सुरज कोळी यास शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी तसेच लोकसेवकांना मारहाण केल्या प्रकरणी दोषी ठरवले.

## अक्षयचा मृतदेह दफन केल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले

### मनसेचा पोलिसांना इशारा

प्रतिनिधी
■ ठाणे

बदलापूर येथील लहान मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकेतील अक्षय शिंदे याला ठाणे पोलिसांनी चकमकीत ठार केले. त्याचा मृतदेह ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या शवागृहात ठेवण्यात आला आहे. त्याचा मृतदेह दफन करण्यास ठिकठिकाणी विरोध होऊ लागला आहे.

गुरुवारी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कळवा येथे अक्षय शिंदे याचा मृतदेह दफन करू नये यासाठी कळवा पोलिसांना पत्रव्यवहार केला आहे. मृतदेह दफन केल्यास रोषाला सामोरे जावे लागले असा इशाराही पत्रात देण्यात आला आहे. बदलापूर येथील लहान मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला ठाणे पोलिसांनी चकमकीमध्ये ठार केले.

हत्येनंतर त्याच्या मृतदेहाचे मुंबईतील जे.जे. रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर त्याचा मृतदेह ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आला आहे. त्याच्या मृतदेहाला दफन करण्यास बदलापूरमध्ये विरोध केला जात आहे. त्यामुळे दफनविधीसाठी ठाणे पोलीस जागेचा शोध घेत आहेत. परंतु कळव्यामधूनही आता त्यास विरोध झाला आहे. मनसेचे ठाणे उपशहराध्यक्ष सुशांत सुर्यराव यांनी कळवा पोलीस ठाण्याला पत्र लिहीले आहे. कळवा शहरातील स्मशानभूमीत विकृत्त मनोवृत्ती असलेला गुन्हेगार अक्षय शिंदे याला दफन करण्यास समस्त नागरिकांचा व मनसेचा विरोध आहे.

## मध्य रेल्वेवरील नेरळ पाडा गेट पाच दिवस बंद, नागरिकांचे हाल

### पर्यायी मार्ग खड्ड्यात हरवला, ओव्हर ब्रीज रस्त्याची होतेय मागणी

प्रतिनिधी
■ कर्जत

मुंबई मध्य रेल्वेचे मेन लाईनवरील नेरळ पाडा येथे असलेले रेल्वेचे गेट काही तांत्रिक दुरुस्तीच्या कामासाठी 26 सप्टेंबरपासून 30 सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवले गेले आहे.आज सकाळ पासूनच हा गेट बंद झाल्याने परिणामी, नेरळ पूर्व आणि पश्चिम भागातील स्थानिक रहिवाशांची कोंडी झाली आहे.नेरळ कळंब या राज्य मार्गात महत्वाचा असलेला हा रेल्वे गेट असल्याने येथील राज्य मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद झाली असून पर्यायी मार्गाने ही वाहतूक वळवण्यात आली, परंतु पर्यायी मार्गाचीच अवस्था झाल्याने वाहनचालकांना मनस्ताप भोगावा लगतो त्यामुळे रेल्वे विभागाने लवकरात लवकर रेल्वेचे काम संपवून प्रवाशी नागरिकांना दिलासा द्यावा म्हणून मगणी होत आहे.तर ओव्हर ब्रीज रस्त्याची देखील होत आहे मागणी.

मुंबई कर्जत या मध्य रेल्वे वर नेरळ हे जंक्शन स्थानक आहे.



या स्थानकात मेन लाईनवरील 86 किलोमीटर अंतर येथे मध्य रेल्वेचे फाटक क्रमांक 21 आहे. नेरळ पूर्व आणि पश्चिम भाग जोडणारा हा महत्वचा भाग असून राज्य मार्ग रस्ता या मार्गात मधून जात आहे. दरम्यान या राज्य मार्गातील रेल्वे गेट पन्नासहून अधिक गाव वाड्या-पाड्यांना जोडणारा आहे,नेरळ मोठी बाजारपेठ आहे,शिवाय नोकरदार वर्गाला येथूनच प्रवास करावा लागत असून मोठ्या प्रमाणत या रस्त्यावरून वाहतूक होत असेत.दोन गावांना जोडणारा मधला रस्ता म्हणून हा गेट दुवा समजला जातो.

मात्र आता हाच गेट बंद झाल्याने अनेक समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे.नेरळ पेशवाई मार्ग पुढे दामत कर्जत कल्याण रस्त्याला जोडणारा पर्यायी मार्ग आहे तर दुसऱ्या बाजूला बोरले जिते असा पुढे आंबिवली गेट मार्ग कर्जत रस्त्याला जोडला गेला आहे,हे दोन्ही पर्यायी रस्ते तयार न केल्याने या मार्गाची अवस्था खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा कळायला मार्ग नाही.



**दिवा।** आमदार राजु पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मनसे दिवा शहर कडून शहरअध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या नेतृत्वाखालील साबेगावातील लक्ष्मी आश्रम वृध्दाश्रम येथे अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. तसेच दिवा रेल्वे स्थानकातील RPF स्टाफ ला बसण्यासाठी आठ खुर्च्या भेट म्हणून देण्यात आल्या. यावेळी मनसे दिवा शहरचे सर्व पदाधिकारी, महिला आघाडी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# घराच्या छतावर वीज निर्मिती करून 600 ग्राहक झाले स्वावलंबी

## पीएम सूर्यघर योजनेचा लाभ; 3400 अर्जांवर प्रक्रिया सुरु

प्रतिनिधी
■ ठाणे

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या भांडुप परिमंडलात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या लाभासाठी आतापर्यंत ३ हजार ४०० जणांनी अर्ज केले आहेत. यातील ६०० ग्राहकांच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित अर्जदारांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्यात येत आहेत. अधिकाधिक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत पर्यावरणपूरक वीज निर्मितीसोबतच आपल्या मासिक वीजबिलात बचत करण्याचे आवाहन भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी केले आहे.

या योजनेत केंद्र सरकारतर्फे तीन किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या प्रकल्पांसाठी ग्राहकांना ७८ हजार रुपयांपर्यंत सबसिडी मिळते. ही योजना फेब्रुवारी महिन्यात सुरू झाली. सौर प्रकल्पातून ग्राहकाच्या गरजेपेक्षा अधिक वीजनिर्मिती झाल्यामुळे वीजबिल शून्य होते. शिल्लक वीज महावितरण विकत घेते. निवासी घरगुती कुटुंबांसाठी प्रति किलोवॅट ३० हजार रुपये अनुदान २ किलोवॅटपर्यंत मिळते. ३ किलोवॅटपर्यंत अतिरिक्त एक किलोवॅट क्षमतेसाठी १८ हजार रुपये अनुदान मिळते. ३ किलोवॅटपेक्षा मोठ्या सिस्टीमसाठी एकूण अनुदान ७८ हजार रुपयांपर्यंत मर्यादित आहे. गृहनिर्माण संस्था व निवासी कल्याणकारी संघटनांकरीता इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंगसह सामाईक उपयोगासाठी १८ हजार रुपये प्रति किलोवॅट अनुदान मिळते. गृहसंकुलासाठी अनुदानाची एकूण कमाल मर्यादा ५०० किलोवॅट आहे.

| मंडल कार्यालय | एकूण अर्ज | सोलर बसवलेले ग्राहक | सौर निर्मिती क्षमता (किलोवॅट) |
|---|---|---|---|
| ठाणे शहर | ३३८ | ५३ | १४९८.९ |
| वाशी | ११०२ | १५० | ८३४.१ |
| पेण | १९६० | ३९७ | १४१५.२५ |
| भांडुप परिमंडल | ३४०० | ६०० | ३७४८.२५ |




महावितरणतर्फे रुफटॉप सोलर बसविणाऱ्या ग्राहकांना सोलर नेट मीटर देण्यात येत आहे. ग्राहक आणि सोलर रूफटॉप बसवणाऱ्या एजन्सींसाठी महावितरणने मीटर चाचणीची प्रक्रिया अतिशय सुलभ आणि जलद केलेली आहे. त्याचप्रमाणे १० किलोवॅटपर्यंत क्षमतेसाठी त्वरित स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे.

या योजनेसाठी सवलतीच्या दरात बँकेकडून कर्ज उपलब्ध होते. पीएम-सूर्यघर योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर प्रकल्प बसवण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. वीज ग्राहकांना https://www.pmsuryaghar.gov.in/ या संकेत स्थळावर योजनेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

# महापालिका क्षेत्रातील 27 गावांमधील रस्ते होणार पथदिव्यांनी प्रकाशमय !

प्रतिनिधी
■ ठाणे

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांचे नेतृत्वाखाली महापालिका क्षेत्रातील २७ गावे व इतर ८ प्रभाग क्षेत्रातील मागणी असलेल्या ठिकाणी पथदिवे व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात सन २०१५ मध्ये २७ गावे समाविष्ट करण्यात आली. या २७ गावांमध्ये विद्युत पथदिवे व्यवस्था ही ग्रामपंचायत काळातील आहे, सदरची पथदिवे व्यवस्था तांत्रिकदृष्टया सक्षम व पुरेशी नसल्याने व या ठिकाणी नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही प्रकारची पथदिवे व्यवस्था नसल्याने, या ठिकाणच्या रस्त्यांचा सर्व्हे करुन नविन पथदिवे व्यवस्था करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे २७.९० कोटी निधीची मागणी करण्यात आली होती. शासनाकडून या कामी महापालिकेच्या मागणीनुसार मुलभुत सुविधेकरीता निधी मंजुर करण्यात आला. २७ गावांमध्ये पथदिवे व्यवस्था करणेकामी निविदा प्रक्रिया सुरु असुन लवकरच काम हाती घेण्यात येणार आहे.

त्यानुसार २७ गावातील मुख्य व अंतर्गत अशा एकूण २०७ रस्त्यांवर महापालिकेकडून पथदिवे व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामध्ये ४६७९ पथदिवे पोल उभे करण्यात येणार आहे. यामुळे महापालिकेच्या २७ गावातील सर्व रस्ते प्रकाशमय होणार आहेत.

तसेच महापालिकेच्या अ, ब, क, ड, जे, फ, ग व ह या प्रभागातील नागरीक, पालिका सदस्य, मा.आमदार यांचे मागणीनुसार पथदिवे नसलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार नवीन पथदिवे व्यवस्था करणेकामी महापालिकेकडून प्रभागनिहाय रक्कम रु. ७.५० कोटीच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. प्रभागातील मागणी असलेल्या ठिकाणी निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पथदिवे उभारण्याचे काम महापालिकेकडून हाती घेण्यात येणार आहे,अशी माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

# ऑनलाईन लग्नस्थळ नोंदणीतून महिलेची फसवणूक

प्रतिनिधी
■ ठाणे

येथील शिळफाटा रस्त्यावरील पलावा येथील एका गृहसंकुलातील तरुणीने ऑनलाईन माध्यमातून एका लग्नस्थळावर सुयोग्य वरासाठी नोंदणी केली होती. या नोंदणीच्या माध्यमातून या महिलेची ओळख एका तरुणाबरोबर झाली. मुलगा पसंत पडल्याने या तरुणीने गेल्या मार्चपासून या तरुणाबरोबर बोलणे, भेटीगाठी सुरू केल्या. दरम्यानच्या काळात या तरुणाने या तरुणीबरोबर शारीरिक संबंध ठेवले. नंतर विवाहास नकार देऊन तरुणीची फसवणूक केली आहे. फसवणूक झालेल्या तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली आहे. पोलिसांनी तात्काळ संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शशांक राजपाल सिंग (२९, रा. राजसदन खैरी, ऋषिकेश, उत्तराखंड) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार तरुणी मनपसंत वराच्या शोधात होती. यासाठी तिला लग्नस्थळ नोंदणीसाठी तिच्या व्हॉट्सअ‍ॅपग्रुपवर एक जुळणी आली. यामध्ये लग्नस्थळ नोंदणीची सुविधा होती. या तरुणीने त्यामध्ये सुयोग्य वरासाठी नोंदणी केली होती. या लग्नस्थळावरील नोंदणीतून तक्रारदार तरुणीची आरोपी शशांक सिंग याच्याशी ओळख झाली. त्याने आपण नोकरदार असल्याचे तरुणीला सांगितले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सा. बां. विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये माजिवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र. ०१ मधील बोरीवडे मैदानात ठा.म.पा. हद्दीतील गणेश विसर्जन नंतरचा राडा रोडाची विल्हेवाट लावणेकरीता आवश्यक कामे करणे अशा एकुण एक कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.२७/०९/२०२४ ते दि.०४/१०/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि.०४/१०/२०२४ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.०४/१०/२०२४ रोजी १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा-मा.मा.प्र.स/६०६/२०२४-२५ सही/-
दि:२६.०९.२०२४
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे
Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन “Traffic Signages” या लेखाशिर्षका अंतर्गत वागळे प्रभाग समिती अंतर्गत विविध ठिकाणी वाहतुक चिन्हे (Traffic Signages) बसविणे च्या कामाकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/ निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in/ येथे दि.२६/०९/२०२४ ते दि. ०३/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील .सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि. ०३/१०/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.०४/१०/२०२४ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-वा.प्र.स/५८२/२०२४-२५ सही/-
दि:२५.०९.२०२४
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे
Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
जलअभियंता विभाग
ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा कागदपत्र क्र. | २०२४_एमसीजीएम_१०९२९८८_१ |
| विषय | एईओसी (टीएम) विभागाअंतर्गत विभागाकरीता आवशयक एअर व्हल्व बॉल गॅसकेट, रबर शीट आणि संबंधित भागांचा पुरवठा. |
| निविदेचे शुल्क | रु. १५५७.६०/- (१३२०/- + १८% जीएसटी) |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. १९,२००/- |
| निविदेच्या वितरण आणि विक्रीचा दिनांक | २७.०९.२०२४ रोजी ११:०० वा. पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृतीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | ०४.१०.२०२४ रोजी १६:०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि लिफाफा सी चे सादरीकरण (ऑन लाईन) | ०४.१०.२०२४ रोजी १६:०० वा. पर्यंत |
| लिफाफा ए आणि बी उघडणे | ०५.१०.२०२४ रोजी १६:०१ वा. नंतर |
| विभागाचे नाव | उप जल अभियंता (देखभाल) |
| संकेतस्थळ | mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | श्री. पी. ए. रोड्रिग्ज<br>सहायक अभियंता ( आऊटसाईड सीटी) ट्रंक मेन |
| संपर्क क्र. | ९९३०२६०५७६ |
| ई-मेल आयडी | ae01dyhemaint.he@mcgm.gov.in |

निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.
बृमनपा कोणतेही कारण न देता वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्विकारण्याचे किंवा कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

पीआरओ/१४०९/जाही/२०२४-२५
सही/-
कार्यकारी अभियंता
(प्रमुख कार्ये) जल कार्ये
गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.

## भरदिवसा घरफोडी करणारी टोळी जेरबंद:17 गुन्हे उजेडात, 15 लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे :** पुणे जिल्ह्यात भरदिवसा घरफोडी करणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखा, तसेच नारायणगाव पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून १९ तोळे सोन्याचे दागिने, दुचाकी, मोबाइल असा १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गणेश गोवर्धन काळे (वय २४), मिलिंद इश्वर भोसले (वय २५) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. आरोपींनी त्यांच्याबरोबर असलेल्या अल्पवयीन साथीदाराच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस निरीक्षक राजेंद्र गवळी यावेळी उपस्थित होते. आरोपी मिलिंद भोसलेविरुद्ध नगर, बीड, पुणे ग्रामीण भागात घरफोडी, जबरी चोरीचे १६ गुन्हे दाखल आहेत.




## म ह त्वा चे

### डी.जी.टी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार (ता. २४) एनएसएस दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत विद्यार्थिनींनी सादर केले. त्यानंतर स्वयंसेवकांना स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयात परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात ११० विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शवला. स्वच्छता मोहिमेत एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपेश केकाणे, प्रा. वृषाली सालस्कर यांनी सहभाग घेतला होता

### ढगफुटी सदृश्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना नुकसान

**लातूर :** लातूर जिल्ह्यात मागील दोन ते तीन दिवसांपासून मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुरुड (ता. लातूर) येथे मंगळवारी ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने काढणीला आलेले सोयाबीन पीक पावसात भिजल्याने शेतकऱ्यांवर संकट आलं आहे. तसेच अनेकांच्या घरांचे, दुकानांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे, त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन नागरिकांना मदत करावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली आहे. त्यांनी पत्राद्वारे जिल्हा प्रशासनाकडे ही मागणी केली आहे. आमदार धिरज देशमुख यांनी मुरुड इथे जाऊन नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाकडे त्वरित नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं आश्वसन शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना दिलं.दरम्यान, मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास मुरुड येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने अचानक पूराची स्थिती निर्माण झाल्याने पूराचे पाणी नागरिकांच्या घरात, बाजारपेठेतील दुकानांमध्ये गेल्याने संसारोपयोगी साहित्य तसेच दुकानांमधील साहित्याचे मोठे नुकसान झाले. यानंतर आमदार धिरज देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचवून नुकसानीची पाहणी केली.

# ठाकरे मंत्र्यांना देखील चार-चार महिने भेटत नव्हते, युतीमध्ये तर टोळी युद्धच दिसते

## तिसऱ्या आघाडीच्या परिवर्तन महाशक्तीच्या मेळाव्यात राजू शेट्टी यांची टीका

प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना देखील चार-चार महिने भेटत नव्हते तर सर्वसामान्य जनतेचा प्रश्नच येत नाही. अशा शब्दात शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. तर दुसरीकडे महायुतीच्या काळात एकमेकांवर कुरघोडी दिसून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात टोळी युद्ध चालू असल्याचे वाटते. अशी टीका



राजू शेट्टी यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर मध्ये परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीत सहभागी सर्व पक्ष पदाधिकाऱ्यांचा संयुक्त मेळावा पार पडला, यावेळी ते बोलत होते.

परिवर्तन महाशक्तीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? असा प्रश्न आता आम्हाला विचारला जात आहे. मात्र हाच प्रश्न महाविकास आघाडीच्या नेत्यांना विचारला असता त्यांनी उत्तर दिले का? किंवा महायुतीतील नेत्यांनी तरी या प्रश्नाचे उत्तर दिले का? असा प्रति प्रश्न राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. परिवर्तन महाशक्तीमध्ये आम्ही सर्वच शोषित, वंचितांचे प्रश्न मांडणारे सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे कार्यकर्ते आहोत. या आघाडीतील सर्वच घटक हे नेते असल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

परिवर्तन महाशक्ती मध्ये कोणी वंचितांचे प्रश्न मांडणारे आहे तर कोणी दलितांचे प्रश्न मांडणारे आहेत. कोणी महिलांसाठी काम करणारे आहेत तर कोणी युवकांसाठी काम करणारे आहेत. कोणी शेतकऱ्यांसाठी तर कोणी दिव्यांगांसाठी काम करणारे आहेत. या परिवर्तन महाशक्ती मध्ये सर्व समावेशक सामाजिक कार्यकर्त्यांचा देखील समावेश असल्याचा दावा राजू शेट्टी यांनी केला आहे.

# जरांगेंच्या उपोषणाची दखल घेत नाहीत

## पती- पत्नीनं उचललं टोकाचे पाऊल!

प्रतिनिधी
■ लातूर

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत. मात्र जरांगे पाटील यांच्या उपोषणाची सरकार दखल घेत नसल्याने लातूरमध्ये पती- पत्नीने टोकाचे पाऊल उचलले आहे. लातूरच्या अहमदपूरमध्ये पती- पत्नीने विषारी द्रव्य प्राशन केले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

लातूर जिल्ह्यातल्या अहमदपूरमध्ये ज्ञानोबा तीडोळे आणि त्यांची पत्नी चंचलाबाई तीडोळे या दोघांनी विषारी द्रव्य प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटीलहे उपोषणाला बसले आहेत. जरांगे पाटील यांनी सहा वेळा उपोषण केले. मात्र उपोषण करूनही सरकारने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही. तसेच मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. मराठा आरक्षण मिळावे यासाठी राज्यात अनेकांनी आत्महत्या झाल्या आहेत. यानंतर पती- पत्नीने हा टोकाचा निर्णय घेतल्याने खळबळ उडाली आहे.

उपोषणाची दखल घेतली जात नसल्याच्या नैराश्यातून तीडोळे पती- पत्नीने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. दरम्यान सदर प्रकार लक्षात आल्यानंतर दोघांनाही लागलीच शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे.

# सॉफ्ट ड्रिंकमध्ये गुंगीचं औषध पाजत 15 वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार

प्रतिनिधी
■ अकोला

अकोल्यातून अतिशय धक्कादायक बातमी समोर आलीये. एका अल्पवयीन मुलीवर तिच्या मैत्रिणीच्या मदतीने 3 तरुणांनी सॉफ्ट ड्रिंकमध्ये गुंगीचं औषध पाजून तिच्यावर सामूहिक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. हा संपूर्ण प्रकार एका वाढदिवसाच्या पार्टीमध्ये घडला होता. या प्रकरणात जुने शहर पोलिसांनी तीन तरुणांसह पीडित मुलीच्या मैत्रीणीवर गुन्हा दाखल केला. दरम्यान, यात बंटी सटवाले, लल्ला इंगळे आणि एक अज्ञात आरोपीचा समावेश आहे. तर पीडित मुलीची मैत्रीण पायल नामक तरुणीवरही गुन्हा दाखल करण्यात आला. सद्यस्थितीत या प्रकरणातील तिघेजण फरार असून पायल एकटीच अटकेत आहे. तिला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथील एक 15 वर्षीय मुलगी तिच्या चुलत मावशीकडे अकोल्यात शिकायला आली होती. ती अकोल्यातील एका शाळेत दहाव्या वर्गात शिकत होती. ती अकोल्यातील एका मुलीची मैत्रीण बनलीय. तिने तिची भेट तिचा मित्र बंटी सटवाले याच्यासोबत करून दिली. तसेच तिच्या चुलत मामीशीसुद्धा भेट करुन दिली होती. चुलत मामीचा पती लल्ला इंगळेने पीडित मुलीला तिचा वाढदिवस असल्याने त्याच्या घरी रात्री 12 वाजता साजरा करु म्हणून नेले. तेथून पीडितेचा मित्र बंटी सटवाले, त्याची मैत्रीण पायल हे मामीच्या घरी गेले. तेथे लल्ला इंगळे व बटी सटवाले यांनी मद्यप्राशन केलंय. त्यांनी पीडितेला जबरदस्तीने सॉफ्टड्रिंकमध्ये गुंगीचा औषध पाजलं. यानंतर दोघांनी तिच्यावर बलात्कार केलाय. त्यानंतर त्यांनी व्हिडीओ बनवले व ब्लॅकमेल केले. या प्रकरणी पायल पोलिसांच्या अटकेत असून अन्य तिघे जण फरार आहेत.

# धनगर आरक्षण उपोषणातून 2 तरुण बेपत्ता, 'जलसमाधी' घेत असल्याची चिठ्ठी सापडली

प्रतिनिधी
■ अहमदनगर|

राज्यभरात सध्या धनगर आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यातील वेगवेगळ्या भागात धनगर समाजाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. अहमदनगर येथे सकल धनगर समाजाच्या वतीने राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहे. अहमदनगरच्या नेवासा फाटा येथे गेल्या ९ दिवसांपासून हे आंदोलन सुरु असून सरकार दखल घेत नसल्याने जलसमाधी घेण्याचा इशाराही या आंदोलकांनी दिला होता. अशातच आता या उपोषणामधील दोन तरुण बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, अहमदनगरच्या नेवासा फाटा येथे




सुरु असलेल्या धनगर आरक्षणाच्या उपोषणामधून दोन आंदोलक बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे. या आंदोलकांनी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जलसमाधी घेण्याचा इशारा दिला होता. अशातच आता दोन आंदोलक तरुण बेपत्ता झाले असून आम्ही जलसमाधी घेत आहोत, यास सर्वस्वी सरकार जबाबदार असल्याची चिठ्ठीही आढळून आली आहे.

प्रल्हाद सोरमारे आणि बाळासाहेब कोळसे अशी या दोन्ही धनगर आंदोलक तरुणांची नावे आहेत. दोघेही काही तासांपासून गायब असून आम्ही जलसमाधी घेत आहोत, यास सर्वस्वी सरकार जबाबदार आहे, अशा आशयाची चिठ्ठी अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरासंगम येथील गोदावरी नदिकाठी सापडली आहे. तसेच गोदावरी पुलावर त्यांच्या चपलाही आढळून आल्या आहेत.



*पंढरपूर: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते तथा विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांचा सद्या पंढरपूर मध्ये दौरा सुरु आहे. या दरम्यान विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी अमित ठाकरे यांची पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे सदिच्छा भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी पंढरपूर -मंगळवेढा मतदार संघांचे उमेदवार मनसे नेते दिलीप बापु धोत्रे, नेते बाबू वागसकर, प्रशांत गिड्डे आदी उपस्थित होते.*

# मोदींच्या दौऱ्यावर कोट्यवधी रुपये वाया - धंगेकर

प्रतिनिधी
■ पुणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज नियोजित पुणे दौरा शहर आणि जिल्हा परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक रद्द करण्यात आला असून, विरोधी पक्षनेत्यांनी जोरदार टीका केली आहे. काँग्रेसचे नेते आणि कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी या दौऱ्याच्या आर्थिक परिणामांवर लक्ष वेधले आणि सरकारवर त्यांनी केलेल्या फालतू खर्चाची टीका केली.

"शहरातील मेट्रोच्या टप्प्याटप्प्याने उद्घाटनासाठी पंतप्रधान मोदी पुण्याला येणार होते, परंतु यामुळे राज्य आणि राष्ट्रीय तिजोरीवर मोठा आर्थिक



बोजा पडणार होता. मोदींना या परिणामाची माहिती नाही," अशी टिप्पणी धंगेकर यांनी केली. "तर संबंधित खर्च हा कोट्यवधी रुपयांपर्यंत चालतो व तो टाळता आला असता. मोदींनी यापूर्वी त्यांच्या कार्यालयातून उद्घाटने केली आहेत.यावेळीही त्यांनी तसे केले असते तर लाखो रुपयांची बचत होऊ शकली असती. त्याऐवजी, आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही उद्घाटन योजना आखण्यात आली आहे, ज्यातून असं भासतं की पुण्यासाठी काहीतरी मोठं केले जात आहे ", असे धंगेकर पुढे म्हणाले.

पुणे मेट्रोचा सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट हा नवीन भुयारी मार्ग अनावश्यक राजकीय धामधूम न ठेवता खुला करावा, अशी सूचना त्यांनी केली. ते म्हणाले, "आम्ही पंतप्रधान मोदी आणि प्रशासनाला विनंती करतो की उद्घाटनाला पुण्यातील स्थानिक ज्येष्ठ नागरिक किंवा नामांकित व्यक्तींसोबत पुढे जाण्याची परवानगी द्यावी. सार्वजनिक पैशांचा अपव्यय होता कामा नये

# दोन कारचा भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू, चार गंभीर

प्रतिनिधी
■ नाशिक

भरधाव वेगाने येणाऱ्या दोन कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. यामुळे झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातातील जखमींना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविले. येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर मालेगाव येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

नांदगाव - मनमाड रस्त्यावरील हिरेनगर शिवारात हा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन कारची समोरासमोर धडक झाल्याने घडलेल्या अपघातात दोन जण जागीच ठार, तर



चार जण गंभीर जखमी झाले आहे. या अपघातात दोन्ही गाड्यांचे देखील मोठे नुकसान झाले. सकाळच्या सुमारास झालेल्या या भीषण अपघातातील मृत व जखमी हे (Jalgaon) जळगाव जिल्ह्यातील पाचोरा व नाशिक जिल्ह्यातील मोहाडी या गावातील असल्याची माहिती समोर आली आहे. अपघातात शिवाजी भास्कर देशमुख (वय ६०, रा.मोहाडी, जि. नाशिक) व उषा नारायण महाजन (वय ६०, पाचोरा, जि.जळगाव) या दोघांचा मृत्यू झाला. तर जखमींमध्ये आशा शिवाजी देशमुख, विकास शिवाजी देशमुख, गयाबाई आदिक देशमुख (सर्व राहणार मोहाडी, नाशिक) व नारायण सुकदेव महाजन (रा. पाचोरा, जळगाव) यांचा समावेश आहे. जखमींना लागलीच उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**जळगाव :** जळगाव शहरातून गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. यात भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेला दुसरा तरुण जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. भुसावळच्या नाहाटा नगर येथील कुणाल राजेंद्र महाले (वय २५) असे अपघातात मृत तरुणाचे नाव आहे. कुणाल हा तीन महिन्यापूर्वीच भुसावळ शहरातील के. नारखेडे महाविद्यालयात लिपिक म्हणून नोकरीला लागला होता.

# उमेदवार घोषित करण्यावरून कार्यकर्त्यांनी जयंत पाटलांना आणले जेरीस

## घोषणांमुळे वैतागलेल्या प्रदेशाध्यक्षांनी मेळाव्यातून घेतला काढता पाय

प्रतिनिधी
■ अहमदनगर

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून राज्यात शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात करण्यात आली आहे. या यात्रेंतर्गत आज अहमदनगरमधील आकोले येथे मेळाव्याचं आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर भाषण करण्यासाठी उभं राहताच कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्याने जयंत पाटील संतापल्याचं बघायला मिळालं आहे. त्यानंतर जयंत पाटील यांनीही कार्यकर्त्यांना चांगलेच सुनावलं. शिवस्वराज्य यात्रेदरम्यान अकोले येथे आयोजित मेळाव्यात हा प्रकार घडला. या घटनेनंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.

काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून राज्यात शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात करण्यात आली. या यात्रेंतर्गत आज अहमदनगरमधील आकोले येथे मेळाव्याचं आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट) प्रदेश अध्यक्ष जयंत पाटीलदेखील उपस्थित



होते. यादरम्यान, जयंत पाटील हे भाषण देण्यासाठी व्यासपीठावर उभे राहिले. मात्र, त्यावेळी काही उत्साही कार्यकर्तांनी उमेदवार घोषित करण्यासंदर्भात घोषणा दिल्या.

घोषणा ऐकताच जयंत पाटील चांगलेच संतापले. घोषणा देणारा कोण आहे? त्याने हात वर करा, असं ते म्हणाले. तसेच मी याठिकाणी भाषण करणार नाही, असं म्हणत त्यांनी तिथून काढता पाय घेतला. मात्र, त्यानंतर स्थानिक नेत्यांनी त्यांची समजूत काढली आणि जयंत पाटील यांनी पुन्हा भाषण करण्यास सुरुवात केली. "असा पोरकटपणा करणार असाल, तर मी भाषण करणार नाही. इथे सगळ्यांची भाषणं झाली आहेत. मला भाषण करण्यात रस नाही. मला पुढचेही कार्यक्रम आहेत. मी लगेच जातो", असं म्हणत त्यांनी थेट कार्यकर्त्यांनाच सुनावलं.

"कार्यकर्त्यांनी तारतम्य बाळगायला पाहिजे"

दरम्यान, यासंदर्भात बोलताना जयंत पाटील म्हणाले, "महाविकास आघाडीचे जागावाटप सुरू आहे. राज्यात २८८ मतदारसंघ आहेत. त्यामुळे थोडा उशीर होऊ शकतो. १ तारखेला जागावाटपावर शिक्कामोर्तब होईल. त्यानंतर आपल्या वाट्याला जे मतदारसंघ येतील तिथे उमेदवार जाहीर केली जातील. मी जर असे उमेदवार घोषित करायला गेलो. तर महाविकास आघाडीत दोन मित्रपक्ष आहेत, ते आक्षेप घेतील. त्यामुळे काहीतरी तारतम्य बाळगायला पाहिजे, कारण आपल्याला आघाडी टिकवायची आहे" तसेच "या मतदारसंघात कुणाला उभे करणार, हे जर तुला कळलं नसेल, तर तुझ्यासारखा येडा दुनियेत माणूस नाही मग", असे ते म्हणाले.

# रत्नागिरीतील जिल्हा परिषदेच्या 2480 शाळांमध्ये फुलली परसबाग

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक वाढावी, पोषण आहारात ताज्या भाज्यांचा समावेश व्हावा, कुपोषण दूर व्हावे, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्याशाळांमध्ये परसबागेची निर्मिती करण्यात येत आहे. शिक्षक, पालक, विद्यार्थी सेंद्रीय भाजीपाला लागवड करीत आहेत. जिल्ह्यात २,४८० शाळांमध्ये परसबाग लागवड करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी अथक परिश्रमातून सुंदर परसबाग निर्मिती करत आहेत. या परसबागेमध्ये मूळा, माठ, मेथी, पालक, मिरची, भेंडी, वालीच्या शेंगा, वांगी, कोथिंबीर, टोमॅटो लागवड करण्यात येत आहे. या भाज्यांचा उपयोग शालेय पोषण आहारात केला जात आहे.

# पितृपक्षात मस्कऱ्या गणेशोत्सव; विदर्भात 237 वर्षांची ऐतिहासिक परंपरा

प्रतिनिधी
■ नागपूर

राज्यात गणेशोत्सव जरी आता संपला असला, तरी विदर्भात मात्र, पुढील काही दिवस हाडपक म्हणजेच 'मस्कऱ्या' गणपतीचा उत्सव साजरा केला जाणार आहे. लाडक्या गणरायाला निरोप दिल्यानंतर 'हाडपक' गणपतीची स्थापना केली जाते. महत्वाचं म्हणजे पितृपक्षात 'हाडपक्या' गणपतीची स्थापना केली जाते. पितृपक्षात जेव्हा शुभकार्य निषिद्ध मानलं जाते, त्यावेळी विदर्भातील 'हाडपक' गणेशोत्सव साजरा केला जातो. विदर्भात गेल्या 237 वर्षांपासून हाडपक गणेशोत्सव साजरी करण्याची परंपरा आहे. विदर्भात मस्कऱ्या गणपतीची परंपरा 237 वर्षे जुनी आहे. 'मस्कऱ्या' गणपतीची स्थापना ही समशेर बहाद्दर



श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले ऊर्फ चिमणाबापू यांनी वर्ष 1787 मध्ये केल्याचे ऐतिहासिक दाखले आढळतात.

इ स 1787 मध्ये श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) यांनी मस्कऱ्या (हडपक्या) या उत्सवाचं आयोजन केलं. या मागील थोडक्यात इतिहास असा, की शूर लढवय्ये सरकार समशेर बहाद्दूर श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) हे अन्याया विरोधात लढत असताना ते बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर विजय मिळवून परत येईस्तोवर कुळाचारी गणपतीचं विसर्जण झालं होतं. बंगालवर विजय मिळवण्याचा आनंद साजरा करण्याकरता 'मस्कऱ्या' (हडपक्या) गणपतीची स्थापना करुन त्यात विविध नकला लावण्या, खडी गम्मत या सारख्या कार्यक्रमाचं आयोजन करुन हा आनंदोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यात आला.

श्रीमंत राजे खंडोजी महाराजांनी पितृपक्षात 'मस्कऱ्या' (हडपक्या) गणपतीची चालु केलेली ही परंपरा आजपर्यंत कायम आहे. श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले हे महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टच्या व्यवस्थापनात हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा करतात. या उत्सवास यावर्षी या उत्सवाला 237 वर्ष पूर्ण होत आहेत.

# नोंदणीच्या नावाखाली बांधकाम कामगारांकडून उकळले हजारो रुपये

## इस्लामपूर येथील एकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

बांधकाम कामगारांसाठी असलेल्या योजनेच्या नोंदणीच्या बहाण्याने त्यांच्याकडून हजारो रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार रत्नागिरीत समोर आला आहे. नोंदणीच्या नावाखाली बांधकाम कामगारांकडून उकळले हजारो रुपये, इस्लामपूर येथील एकावर गुन्हा दाखल

बांधकाम कामगारांसाठी असलेल्या योजनेच्या नोंदणीच्या बहाण्याने त्यांच्याकडून हजारो रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार रत्नागिरीत समोर आला आहे. याप्रकरणी नरेंद्र करंजुसकर (रा. इस्लामपूर, जि. सांगली) याच्याविरुद्ध रत्नागिरी शहर पोलिस स्थानकात मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. जिल्ह्यातील कामगार सहायक आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. यासाठी या विभागाच्या पोर्टलवर बांधकाम कामगारांना ऑनलाइन नोंदणी करावी लागते.

या मंडळाचे कार्यालय शहरातील शिवाजीनगर भागातील शिवरूद्र प्राइड या इमारतीत आहे. त्यामुळे नोंदणीसाठी या कार्यालयात सदैव कामगारांची ये-जा असते. हे हेरून करंजुसकर याने या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर आपले खासगी कार्यालय थाटले. आपले कार्यालय सहायक कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत काम करत असल्याचे करंजुसकर, तसेच त्याच्या इतर कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत होते. कामगारांची अधिकृत नोंदणी व नूतनीकरण केवळ १ रुपयात होते. मात्र, करंजुसकर याने १००० ते १५०० रुपये कामगारांकडून घेतल्याचे पुढे आले आहे. याबाबत काही कामगारांनी विचारणा करता आम्हाला या कार्यालयाला पैसे द्यावे लागत असल्याने एवढे पैसे घ्यावे लागत असल्याचे कारण सांगितले.

**मुंबई :** मालाड (पूर्व ) सेंट. फ्रान्सिस हायस्कूल येथे झालेल्या पी वॉर्ड सहशालेय लेझिम स्पर्धेत एकुण १४ शाळांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये मालाड,मालवणीच्या आयडीयल इंग्लीश हायस्कूल शाळेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. असरा खान, अनुष्का भारती, आयत रिझवी, आराध्या चौहान, नौशीन शेख, सोनाक्षी सिंग, तानिया शेख, महेंद्र शर्मा , रुद्र तूनकर, मिताली रत्नपारखे, आलिया अन्सारी , झुबेरिया अन्सारी , झकिया शेख , इक्रा परवेझ शेख , सबा शेख , नौशीन कुरेशी, वैष्णवी वाल्मिकी, आर्यन खंडागळे, धैर्य मोरे , विशाल पांढरे , प्रतीक गुप्ता, सुफियान खान , यश पाटील , अभिषेक सहानी , हसन पियादा, हमझा शाब्दी, सोनाली सहानी, मुस्कान शेख, मुस्कान पटेल, कोमल भोजने, सादिका चौधरी, तनिषा होसामने, आंचल शर्मा , सहेली शेख, इनाया खान , गौसिया शेख , इंतेझार फातिमा सय्यद , वरून चौहान, नौमान शेख, गुफ्रान खान ,वाद्य वादक - फैज खान, मीतेश भालेराव , प्रियेश भालेराव इत्यादी विद्यार्थ्यांचा सहभाग होता.



# भारताचे यश कौतुकास्पदच, पण महिलांत बुद्धिबळाची आवड वाढवणे गरजेचे

## पाच वेळचा जगज्जेता विश्वनाथन आनंदचे प्रतिपादन

**नवनाथ दांडेकर**
■ मुंबई

यंदाच्या ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या महिला आणि पुरुष बुद्धिबळपटूंनी गाजवलेला भीमपराक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. पण देशात महिला बुद्धिबळाचा स्तर उंचावण्यासाठी आपण सर्वानीच अधिक प्रयत्न कार्याला हवेत ,असे प्रतिपादन पाचवेळचा जगज्जेता बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांने मुंबईत एमआयजी क्लब येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. लंडन येथे ३ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत टेक महिंद्रा ग्लोबल चेस लीग खेळवण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने स्पोर्ट्स जर्नालिस्ट असोसिएशन ऑफ मुंबईने आनंदसोबत वार्तालापाचा कार्यक्रम मुंबईत आयोजित केला होता.

'बुद्धिबळ आयकॉन' विश्वनाथन आनंदने भारतीय बुद्धिबळ संघाच्या दुहेरी सुवर्णपदकप्राप्तीबद्दल आनंद व्यक्त केला.तो म्हणाला देशात बुद्धिबळात टॅलन्टची वानवा नाही. पण आपल्याला युवकांप्रमाणेच युवतींमध्येही बुद्धिबळाचा टॅलेन्ट शोधून ते जोपासायला हवे. मुलींमध्ये या खेळाचा प्रसार करून आवड निर्माण करणे हि काळाची गरज आहे.आपले पुरुष बुद्धिबळपटू जगात टॉपवर जात आहेत. तसाच पराक्रम आपल्या लेकींकडूनही अपेक्षित आहे.मला खात्री आहे कि आमच्या लेकही मुलांपेक्षा कमी नाहीत.त्यासाठी आपण बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये मिळालेले सोनेरी यश एनकॅश करणे गरजेचे आहे,असेही आनंद म्हणाला

भारतीय बुद्धिबळपटूंनी ऑलिम्पियाडमध्ये मिळवलेल्या उज्वल यशाचा टेम्पो कायम राखण्यासाठी आपण आतापासूनच या खेळाचा प्रसार आणि प्रचार तळागाळापासून करायला हवा. आता मिळालेल्या यशावर समाधानी न राहता हेच यश टिकवण्यासाठी परिश्रम घ्याल हवेत. कारण आपल्यापुढे जगातील रशिया ,चीन आणि अमेरिकेसारख्या बलाढ्य संघांचे आव्हान भविष्यात कायम आहे. त्यामुळे येत्या दशकात आपल्याला टॉपचे स्थान मिळवण्यासाठी जोरदार संघर्ष करावा लागणार आहे, असे ५४ वर्षीय माजी जगज्जेता आनंद म्हणाला.आनंदच्या या आजच्या वार्तालापात टेक महिंद्रा ग्लोबल चेस लीगचे सीईओ समीर पाठक आणि ग्लोबल चेस लीगचे संस्थापक सदस्य पराग शाह हे उपस्थित होते.



छायाचित्र - अनिल पानस्कर

### पुरुष खेळाडूंचा सहज विजय, पण महिलांना संघर्ष करायला लागला

*यंदाच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये पुरुष गटात डी.गुकेश आणि आर.प्रज्ञानंद यांनी शानदार कामगिरी साकारत जगातल्या टॉप खेळाडूंना चकित केले. त्यांची अभिनंदन करावे तेव्हढे थोडे आहे. मात्र महिला गटात आपल्या बुद्धिबळपटूंना सुवर्णपदकासाठी जोरदार संघर्ष करावा लागलाय असे सांगून आनंद म्हणाला हि बाब लक्षात ठेऊन आपण सर्वानीच महिला आणि मुलींत बुद्धिबळाची आवड वाढवण्यासाठी तळागाळापासून प्रयत्न करायला हवेत.खेळ वाढवा आणि या खेळाचा देशातील डोलारा भक्कम करण्यासाठी झटले तर मोठे यश निश्चितच मिळेल असा मला विश्वास आहे ,असे आनंद शेवटी म्हणाला.*

*यंदाच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील यशाचे प्रेरणास्थान म्हणून मला गौरवण्यात येत असले तरी भारतीय बुद्धिबळपटूंनी केलेल्या कामगिरीचे महत्व त्याहून अधिक आहे. माझे आयुष्यातील यश हे केवळ निमित्तमात्र आहे. भारताच्या सर्व युवा आणि प्रज्ञावान बुद्धिबळपटुंचा मला अभिमान वाटतो.त्यांना भविष्यातील उज्वल यशासाठी माझ्या शुभेच्छा कायमच राहणार आहेत.*

***- विश्वनाथन आनंद ,माजी जगज्जेता बुद्धिबळपटू***

*'क्रिकेट विश्वचषक जिंकल्यावर भारतीयांना जसा क्रिकेटचा लळा लागला आणि देशात या खेळाचा प्रसार झाला,तसेच आता बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील दुहेरी यशानंतर भारतीयांत बुद्धिबळ या खेळाची आवड वाढवण्याची संधी आपण साधायला हवी.तळागाळापासून या खेळाच्या प्रसार आणि प्रचारासाठी आपण झटायला हवे असे माझे मत आहे.'*

***- ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे***

## शाकिब अल हसनची निवृत्ती

# ...जर बांगलादेशला परतू शकलो नाही तर कानपूर कसोटी शेवटची असेल!

**वृत्तसंस्था**
■ कानपुर

बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शकिब अल हसनने निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने गुरुवारी अचानक पत्रकार परिषद बोलावून आपली शेवटची कसोटी मीरपूरमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार असल्याचे सांगितले. कानपूर कसोटी खेळण्याबाबत शंका असली तरी तो भारतीय दौऱ्यावर बांगलादेश संघाचा भाग आहे.

37 वर्षीय बांगलादेशी अष्टपैलू खेळाडू म्हणाला- 'मीरपूरमध्ये शेवटची कसोटी खेळण्याची मी माझ्या बोर्डाकडे इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या मायदेशी परतण्यासाठी प्रयत्नही करत आहेत, असे झाले नाही तर भारताविरुद्धची कानपूर कसोटी हा माझा शेवटचा सामना असेल. शाकिब म्हणाला- 'मी माझ्या देशात जाऊ शकतो, पण तिथे माझे काय होईल हे मला माहीत नाही.'



शाकिब अल हसन गेल्या काही दिवसांपासून सेंट्रल सेरस कोरिओरेटिनोपॅथी (CSC) या आजाराने त्रस्त आहे. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये डोळयातील पडदा खाली द्रव जमा होतो. जे दृष्टीस अडथळा आणतात. या समस्येमुळे भारताविरुद्ध चेन्नई येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात शाकिबने गळयात काळा धागा बांधला होता आणि तो तोंडाने दाबताना दिसला होता. ही पद्धत त्याने स्वतःच आखली होती.भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात शाकिबला केवळ 32 धावा तर दुसऱ्या डावात 25 धावा करता आल्या. चेन्नईत खेळल्या गेलेल्या या कसोटीत त्याला एकही विकेट मिळाली नाही.

# आरटीओ कर्मचारी संघटनेचा बेमुदत संप संस्थगित

**प्रतिनिधी**
■ मुंबई

आरटीओ कर्मचारी संघटनेने कर्मचा-यांच्या मागण्यासांठी २४ सप्टेंबर २०२४ पासून सुरू केलेला बेमुदत संप आंदोलन काल संध्याकाळी .संस्थगित करण्यात आल्याची माहिती सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी दिली.

काल परिवहन आयुक्त कार्यालयात सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. सदर चर्चेत संघटनेच्या मागणीनुसार ३०/११/२०२४ पर्यंत वरिष्ठ लिपिक ते कार्यालय अधिक्षक पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यात येतील. तो पर्यंत पात्र कर्मचा-यांना तदर्थ पदोन्नती देण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले.

महसुल विभागानूसार बदल्या करण्याचे धोरण रद्द करण्यात आले असून पूर्वीप्रमाणेच बदलीकरिता पूर्वीप्रमाणेच १५ विभागातंर्गतच बदल्या करण्याचेही मान्य केले. प्रशासनाने इतर मागण्यांवरही सकारात्मक निर्णय घेण्याचेही मान्य केले. त्यामुळे २४ सप्टेंबर २०२४ पासून सुरू केलेला बेमुदत संप संस्थगित करण्यात आला आहे. असे सरतापे यांनी सांगितले.

# माहीम ज्युवेनाईल स्पोर्टस क्लब कॅरम स्पर्धेत रेहान शेख विजेता

■ मुंबई

माहीम ज्युवेनाईल स्पोर्ट्स क्लब-एमजेएससी व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित माहीम ज्युवेनाईल चषक आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धेमध्ये वरळी सी फेस म्युनिसिपल स्कूलचा रेहान शेख विजेता ठरला. अचूक फटकेबाज खेळासह गेममधील सर्व बोर्डात राणीवर वर्चस्व राखत रेहान शेखने अंतिम फेरीमध्ये जोरदार मुसंडी मारणाऱ्या पोद्दार अकॅडमी हायस्कूल-मालाडच्या प्रसन्न गोळेचे आव्हान २५-० असा नील गेम देत संपुष्टात आणले आणि अजिंक्यपदाच्या माहीम ज्युवेनाईल चषकाला गवसणी घातली. विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्काराने एमजेएससीचे अध्यक्ष विजय येवलेकर,




सेक्रेटरी राजन गुप्ता, उपाध्यक्ष विकास खानोलकर, खजिनदार महेश शेट्ये, कार्यकारी सदस्य प्रसाद कुलकर्णी, माजी क्रिकेटपटू सुरेंद्र बाबरेकर, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले.

शिवाजी पार्क येथील माहीम ज्युवेनाईल पव्हेलीयनमध्ये तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यात रेहान शेखने सरळ जाणाऱ्या सोंगट्या सहज घेत कस्तुरबा गांधी स्कूलच्या सिध्दांत मोरेला १९-० असे नमविले. दुसरा उपांत्य फेरीचा जनगणमन ज्युनियर कॉलेज-कोपरचा अथर्व म्हात्रे विरुध्द प्रसन्न गोळे यामधील सामना अखेरपर्यंत चुरशीचा झाला. शेवटच्या बोर्डा अगोदर ९-७ अशी आघाडी घेणाऱ्या अथर्व म्हात्रेला निर्णायक क्षणी सर्वांगसुंदर खेळ करीत प्रसन्न गोळेने १४-९ असे चकविले आणि अंतिम फेरीत धडक दिली.

# केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आणि शिष्टमंडळाचे मुंबईत आगमन

**प्रतिनिधी**
■ मुंबई

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंह संधू यांच्या शिष्टमंडळाचे आज रात्रौ 8 वाजता मुंबई विमानतळावर आगमन झाले. महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी



त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी.प्रदीप तसेच मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या या शिष्टमंडळात वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त धर्मेंद्र शर्मा, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त नितेश व्यास, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीश गर्ग, उपनिवडणूक आयुक्त हिर्देश कुमार, उपनिवडणूक आयुक्त अजित कुमार, उपनिवडणूक आयुक्त मनोजकुमार साहू, उपनिवडणूक आयुक्त संजय कुमार, उपनिवडणूक आयुक्त त्याचबरोबर आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समावेश आहे.

दि. २७ ते २८ सप्टेंबर या दोन दिवसीय भेटी दरम्यान भारत निवडणूक आयोगाचे अधिकारी हे राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, मुख्य निवडणूक अधिकारी, मुख्य सचिव यांच्यासह राज्यातील विविध अंमलबजावणी अधिकारी यांच्यासोबत आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेणार आहेत.

# सर्व धर्मांच्या अनधिकृत धार्मिक वास्तू आहेत पण लक्ष्य केले जाते मशिदिंना

## मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी - सपा आमदार रईस शेख

**प्रतिनिधी**
■ मुंबई

धारावीतील मशिदीची इमारत तोडक कारवाईच्या पार्श्वभूमीवर समाजवादी पक्षाचे (सपा) आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून मुंबई आणि महानगर प्रदेशातील धार्मिक वास्तू तोडक कारवाईबाबत सर्वपक्षीय बैठक घेण्याची मागणी केली आहे. शेख म्हणाले की, राजकीय फायद्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी धार्मिक ध्रुवीकरणाचे वातावरण निर्माण केले जात आहे. शेख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तसेच अल्पसंख्याक व्यवहार मंत्री अब्दुल सत्तार यांनाही हे पत्र पाठविले आहे.

धारावीतील मशिदीला धार्मिक रंग देऊन निवडणूकपूर्व तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे शेख यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. मुंबई महानगर प्रदेशात अनधिकृत धार्मिक स्थळांना, विशेषत: मुस्लिम समुदायाच्या लोकांना लक्ष्य करण्याचा ट्रेंड उदयास येण्याची शक्यता आहे. राजकीय फायद्यासाठी समाजात तेढ निर्माण करण्याचा घाट घातला जात असल्याचे शेख म्हणाले.

मुंबई आणि महानगरात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि इतर धर्माच्या असंख्य अनधिकृत धार्मिक वास्तू आहेत. मात्र विशेषत: मुस्लिम समाजाच्या धार्मिक वास्तूंना लक्ष्य करण्याचा एक प्रकार दिसतो. उजव्या विचारसरणीच्या शक्ती हा मुद्दा चिघळवत आहेत. अशा घटना महाराष्ट्राच्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुरोगामी मूल्यांना शोभत नाहीत, असे शेख पुढे म्हणाले.

मुस्लिम समुदायाला लक्ष्य करण्याच्या प्रकाराला अधोरेखित करून शेख म्हणाले की, या विषयावर चर्चा करण्यासाठी आणि एकमत होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांची बैठक बोलावण्याची गरज आहे. तसेच, सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना संयम बाळगण्याचे निर्देश दिले पाहिजेत. म्हणून, मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर या विषयावर सर्वपक्षीय बैठक आयोजित करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

निविदा करिता विनंती - एमआरवीसी/डब्ल्यू/२२४

**(दो-लिफाफे ई-प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)**

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड (MRVC),** ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन बिल्डिंग, मुंबई - ४०० ०२० येथे आहे, ते **"मुंबई शहरी परिवहन प्रकल्प (MUTP) टप्पा-IIIA अंतर्गत पश्चिम रेल्वेच्या बोरीवली-विरार स्थानकांदरम्यान प्रस्तावित ५वी आणि ६वी रेल्वे लाईनच्या संदर्भात वसई खाडीत महत्त्वाच्या पुलांचे (Br. No. ७३ आणि ७५), पंजू बेटावरील लहान पुलाचे (Br. No.७४) निर्माण, साइड ड्रेन, रिटेनिंग वॉल तसेच भायंदर स्टेशन ते नायगाव स्टेशन दरम्यान व पंजू बेटावरील (CH. ४३७०० ते CH. ४७५००) रेल्वे तटबंदीच्या मातीच्या कामांसाठी"** ई-निविदा आमंत्रित करते. निविदेचा तपशील आणि निविदा कागदपत्रे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **https://eprocure.gov.in/eprocure/app** वर उपलब्ध आहेत. वेबसाइट **https://eprocure.gov.in/eprocure/app** वर पूर्ण ई-निविदा जमा करण्याची **अंतिम तारीख ३०.१०.२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत आहे. शुद्धिपत्र, असल्यास, फक्त वेबसाइटवरच प्रसिद्ध केले जाईल.** SNP 02

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक ) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५२५१) हे जिल्हा उप निबंधक / पूर्व / मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ०८ कामाकरीता बी- १ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक २७.०९.२०२४ सकाळी ०३.०० पासून दिनांक ०४.१०.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (पूर्व).**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

CPRO/A/763

Follow us: @mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**बांधकाम विभाग**

**निविदा सुचना क्र. ४२ (२०२४-२५)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील १ कामाकरीता अनुभवी कंत्राटदाराकडुन ( उत्पादक / पुरवठादार) बी-१ नमुन्यात 'ई' - निविदा मागवित आहेत.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २७/०९/२०२४ ते दि. ६ /१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा हया दि. ६ /१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोडकरणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. ७ /१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

निविदापूर्व बैठक दि. ३/१०/२०२४ रोजी ३.०० वाजता शहर अभियंता कार्यालय, प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे घेण्यात येईल.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासकांनी राखून ठेवला आहे, याबद्दलचा त्यांचा निर्णय अंतिम व सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

**जाक्र. - कडोंमपा/ जसंवि/मुका /१७१८**
**दिनांक- २६/०९/२०२४.**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**के. ई. एम. हॉस्पिटल, परेल, मुंबई – ४०००१२**

**ई-प्रापण निविदा सूचना**

क्र. केईएम/ ४३/टीडीआरई-जन दिनांकित : २६.०९.२०२४

हि ई - निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त खालील कामासाठी "दर तत्वावर" ई-निविदा मागवित आहेत:

| अनु. क्र. | वर्णन | छाननी शुल्क (रु.) | इरठे रक्कम रु. | पतमापन रु. | ऑनलाईन डाऊनलोडिंग सुरु होण्यचा दिनांक आणि वेळ | ऑनलाईन सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | केईएम/३७४/टीडीआरई-III प्रमाणित साहित्यासह आणि तीन वर्षांची वॉरंटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सीएमसी सह केईएम हॉस्पिटलच्या निओनॅटोलॉजी, एनआयसीयू विभागासाठी निओनटल कन्व्हवेन्शनल व्हेंटीलेटर्स (२ नं) चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९३९८४ | ६,६००/- + १८% जीएसटी | ४९,२००/- | १० लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |
| २ | केईएम/३७६/टीडीआरई-III प्रमाणित साहित्यासह आणि तीन वर्षांची वॉरंटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सीएमसी सह केईएम हॉस्पिटलच्या अर्थोपेडीक विभागासाठी वेपोरायझर सह अनेस्थेसिया वर्कस्टेशन (१ नं) चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९४००४ | ६,६००/- + १८% जीएसटी | २७,६५०/- | १० लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |
| ३ | केईएम/३७७/टीडीआरई-III एक वर्षाच्या वॉरंटीसह केईएम हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागासाठी सेमी रिगीड युरेटेरोरेनोस्कोप चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९४०१८ | ६,६००/- + १८% जीएसटी | २६,०००/- | १० लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |
| ४ | केईएम/३७९/टीडीआरई-III प्रमाणित साहित्यासह आणि तीन वर्षांची वॉरंटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सीएमसी सह केईएम हॉस्पिटलच्या मायक्रोबायोलॉजी विभागासाठी एलिसा रीडर आणि वॉशर सिस्टीम (२ नं) चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९४०३२ | ६,६००/- + १८% जीएसटी | २५,५००/- | १० लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |
| ५ | केईएम/३८०/टीडीआरई-III प्रमाणित साहित्यासह आणि तीन वर्षांची वॉरंटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सीएमसी सह केईएम हॉस्पिटलच्या अर्थोपेडीक विभागासाठी पेन्यूमटिक टोर्निक्वेट सिस्टीम (५ नं) चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९४०९६ | ३,३००/- + १८% जीएसटी | २०,२२०/- | ५ लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |
| ६ | केईएम/३६६/टीडीआरई-III प्रमाणित साहित्यासह आणि तीन वर्षांची वॉरंटी संपल्यानंतर पाच वर्षांच्या सीएमसी सह केईएम हॉस्पिटलच्या पलमोनरी मेडिसिन विभागासाठी सी-आर्म मशीन (१ नं) चे एसआयटीसी. ई-निविदा आयडी-२०२४_एमसीजीएम_१०९४१०६ | ६,६००/- + १८% जीएसटी | ३१,२५०/- | १० लाख | २७.०९.२०२४ १६.०० वा. | ०७.१०.२०२४ १६.०० वा. |

निविदा सूचनेसह निविदा कागदपत्र बृमनपा पोर्टल (http://www.BMC.gov.in) वर उपलब्ध आहे. तथापि, बोली महाटेंडर पोर्टल (https://mahatenders.gov.in) द्वारे मागविण्यात येत आहेत. सदर निविदेच्या संदर्भात कोणतेही शुद्धिपत्रक असल्यास केवळ महाटेंडर पोर्टल आणि बृमनपा पोर्टलवर प्रसिद्ध केले जाईल ह्यांची निविदाकारांनी कृपया नोंद घ्यावी. स्थानिक वृत्तपत्रामध्ये कोणतेही शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले जाणार नाही. निविदा कागदपत्रे टपालाद्वारे वितरीत किंवा प्राप्त केली जाणार नाहीत.

पीआरओ/१४१६/जाही/२०२४-२५

**सही/-**
**अधिष्ठाता**
**(केईएम हॉस्पिटल )**

झाडे लावा, झाडे जगवा

## पत्नीला बिकिनीमध्ये पाहण्यासाठी पतीने 418 कोटींना खरेदी केलं संपूर्ण बेट

**दुबई :** दुबईतील एका हाऊसवाइफने मोठा दावा केला आहे. आपल्याला समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षित वाटावे, म्हणून आपल्या पतीने आपल्यासाठी एक प्रायव्हेट आयलँड विकत घेतल्याचे एका महिलेने म्हटले आहे. सौदी अल नदाक असे या महिलेचे नाव आहे. सौदी अलने इंस्टाग्रामवर प्रायव्हेट आयलँडचा व्हिडिओदेखील शेअर केला आहे. या व्हिडिओला कॅप्शन देत तिने लिहिले, "POV : आपली बिकिनी घालण्याची इच्छा होती. यामुळे आपल्या कोट्यधीश पतीने आपल्यासाठी एक आयलँड विकत घेतले." 26 वर्षीय सौदी अल नदाक दुबईतील बिझनेसमन जमाल अल नदाक यांची ब्रिटिश वंशाची पत्नी आहे. एचटीसोबत बोलताना तिने, आपण 'फुल टाइम हाऊसवाइफ' असल्याचे म्हटले आहे. दुबईमध्ये शिकत असताना या हाय-प्रोफाइल कपलची भेट झाली. त्यांचे लग्न होऊन तीन वर्षे झाली आहेत. सौदी अल नदाक हाऊसवाइफ असल्याशिवाय, एक इंफ्लुएन्सर म्हणूनही ओळखली जाते. तिच्या इंस्टाग्राम आणि टिकटॉक अकाउंटवरून, तिच्या लाइफस्टाइलचा अंदाज येऊ शकतो.



# अब्दुल्ला व नेहरू 40 हजार हत्यांसाठी जबाबदार

## काश्मिरात दहशतवाद फोफावला तेव्हा फारुख लंडनमध्ये महागडी मोटारसायकल चालवत होते

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

गृहमंत्री अमित शहा आज जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक रॅली घेत आहेत. चेनानी आणि उधमपूरमध्ये त्यांनी लोकांना संबोधित केले. जम्मू-काश्मीरमधील 40 हजार लोकांच्या हत्येला अब्दुल्ला आणि नेहरू जबाबदार आहेत, असे ते म्हणाले.

फारुख अब्दुल्ला त्यावेळी कुठे होते? ते उन्हाळ्यात लंडनमध्ये सुट्टी घालवत होते आणि महागडी मोटारसायकल चालवत होते. केवळ भाजपने जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद संपवला आहे.



आपल्या देशाच्या संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझल गुरूच्या फाशीच्या शिक्षेविरोधात हे लोक आंदोलन करत होते, असे शहा म्हणाले. अफजल गुरूला फाशी देऊ नये, असे ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले होते. ओमर अब्दुल्ला साहेब, तुम्ही दहशतवाद्यांना बिर्याणी खाऊ घालता, पण तुम्ही पसरवलेल्या दहशतीला फाशीनेच उत्तर दिले जाईल. चार दिवसांपूर्वी नौशेरा येथे निवडणूक प्रचारादरम्यान शहा म्हणाले होते - फारुख अब्दुल्ला यांची इच्छा आहे की आपण दहशतवादावर पाकिस्तानशी चर्चा करावी. दहशतवाद संपेपर्यंत आम्ही पाकिस्तानशी चर्चेच्या बाजूने नाही.

फारुख अब्दुल्ला म्हणाले की ते कलम 370 परत आणू. फारुख साहेब, आता कोणीही कलम 370 परत आणू शकत नाही. आता बंकरची गरज नाही, कारण कोणीही गोळीबार करण्याचे धाडस करणार नाही. तिथे गोळी आल्यास गोळीला गोळ्याने उत्तर दिले जाईल.

शहा यांच्या हल्ल्याला फारुख अब्दुल्ला यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, केंद्र सरकार चीनशी बोलू शकते, ज्याने आमच्या 2 हजार किलोमीटर जमिनीवर कब्जा केला आहे. तुम्ही पाकिस्तानशी का बोलू शकत नाही? दहशतवादावर उपाय शोधला पाहिजे. आमची जनता किती दिवस मरत राहणार?

दहशतवादाला आम्ही अंडरवर्ल्डमध्ये गाडून टाकू. आज जम्मू-काश्मीरमध्ये तिरंगा अभिमानाने फडकवला जात आहे. त्यांना शेख अब्दुल्ला यांचा झेंडा परत आणायचा आहे. जम्मू-काश्मीरमध्ये फक्त आमचा तिरंगा फडकेल. आपण पाकिस्तानशी चर्चा करावी अशी त्यांची इच्छा आहे. दहशतवाद संपेपर्यंत आम्ही पाकिस्तानशी चर्चेच्या बाजूने नाही. त्यांना तुरुंगातून दहशतवाद्यांची सुटका करायची आहे, पण नरेंद्र मोदी सरकारने दहशतवादाला खूप खोलवर गाडले आहे. कोणत्याही दहशतवादी किंवा दगडफेकीची तुरुंगातून सुटका होणार नाही. पहाडी, गुर्जर बकरवाल, दलित, वाल्मिकी, ओबीसी समाजाला दिलेल्या आरक्षणाचा पुनर्विचार केला जाईल, असे काँग्रेस, एनसीने म्हटले आहे. राहुल गांधी अमेरिकेत जाऊन सांगतात की आता त्यांचा विकास झाला आहे, आता त्यांना आरक्षणाची गरज नाही. राहुलबाबा, आम्ही तुम्हाला आरक्षण काढू देणार नाही.

## भाजपने खेळाडू संपवले, महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ करणाऱ्यांना वाचवले



**वृत्तसंस्था**
**कर्नाल**

राहुल गांधी यांनी गुरुवारी असंध, कर्नाल येथे जाहीर सभेला संबोधित केले. काँग्रेस नेते म्हणाले की, भाजपने खेळाडूंना संपवले आहे. महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ करणाऱ्यांना वाचवले.

ते म्हणाले की भारताचे सरकार चालवणारे 90 लोक आहेत. त्यात फक्त 3 दलित आहेत. तिथे 45 असायला हवेत. हा लढा हरियाणा वाचवण्यासाठी नसून भारत आणि संविधान वाचवण्यासाठी आहे. भाजपने सर्व संस्था आरएसएसच्या ताब्यात दिल्या. संपूर्ण नियंत्रण नागपूरचे आहे.

राहुल म्हणाले की, भाजपच्या 10-15 लोकांना चिनी वस्तू विकायच्या आहेत. देशात काही बनवायचे नाही. त्यांनी हरियाणात 2 लाख सरकारी नोकऱ्या आणि शेतकऱ्यांना MSP ची कायदेशीर हमी देण्याचे आश्वासन दिले.

या रॅलीत राहुल गांधींनी भूपेंद्र हुडा आणि कुमारी सेलजा यांना मंचावर एकत्र आणले. तिकीट वाटपात दुर्लक्ष केल्याबद्दल आणि हुड्डा समर्थकांनी कथित जातीय टिप्पणी केल्याबद्दल सैलजा संतापल्या होत्या. आता काही वेळाने हिसारच्या बरवाला येथे राहुल गांधींची दुसरी सभा होणार आहे.

याआधी आठवडाभरापूर्वी राहुल गांधी सकाळी अचानक कर्नालला पोहोचले होते. जिथे त्यांनी परदेशात जखमी झालेल्या तरुणाच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. जिथे तुम्हाला माझी गरज असेल तिथे संसदेत आवाज उठवावा लागेल, माझे जवळचे नाते आहे, जुने नाते आहे, असे काँग्रेस नेते म्हणाले. मी खोटे बोलत नाही, हे मोदीजींचे काम आहे. आता हरियाणाला उभं राहावं लागणार आहे, कारण देवसारख्या रडणाऱ्या मुलांचे अश्रू पुसावे लागणार आहेत. त्यांना खूश केले पाहिजे.

ते म्हणाले की, भारत सरकार नव्वद लोक चालवतात, त्यापैकी तीन दलित आहेत. 45 असायला हवेत. तुम्ही बजेट किती सांभाळता? हे भारताचे सत्य आहे. मी मोदीजींसमोर म्हटले आहे की मी ते पास करून घेईन. ते वाटपाचे काम करतात. एका जातीला दुसऱ्या जातीशी लढवण्यात मीडियावाले 24 तास व्यस्त असतात. केवळ अदानी जी बचाओ सुरू असते. हरियाणात काँग्रेस स्वीप पार्टी करणार आहे. हे जे सरकार स्थापन होणार आहे ते संपूर्ण हरियाणाचे सरकार असेल.

पान १ वरुन

### आर्थिक निकषावरील EWS आरक्षण लवकरच रद्द होईल

धोक्यात येईल आणि आरक्षण संपुष्टात आणेल, अशा केलेल्या प्रचाराबाबत विचारले असता पी. चिदंबरम म्हणाले की, भाजपा घटनेमध्ये दुरुस्ती करणार आहे आणि त्यांच्याकडून याची तयारी सुरू होती. चिदंबरम पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत बहुमत हुकलं तरी भाजपा घटनेमध्ये दुरुस्ती करण्याची योजना आखत आहे, मोदी सरकार आरक्षण संपुष्टात आणण्याची किंवा तसं काही करण्यासा मागेपुढे पाहणार नाही. ईडब्ल्यूएसमधून १० टक्के आरक्षण कायम ठेवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये दिलेल्या निकालाबाबत चिदंबरम म्हणाले की, पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ३-२ अशा फरकाने याबाबतचा निकाल दिला होता. उर्वरित दोन न्यामूर्तींनी याबाबत नोंदवलेल्या अहसमतीबाबत कुणी वाचलंय का? एक दिवस ३-२ अशा बहुमताने दिलेला निकाल बदलताही येऊ शकतो. तसेच हे लवकरच होईल, अशी अपेक्षा आहे, असं भाकितही पी. चिदंबरम यांनी केलं.

### मोदींच्या हस्ते 3 परम रुद्र महा संगणकांचे लोकार्पण

धोक्यात येईल आणि आरक्षण संपुष्टात आणेल, अशा केलेल्या प्रचाराबाबत विचारले असता पी. चिदंबरम म्हणाले की, भाजपा घटनेमध्ये दुरुस्ती करणार आहे आणि त्यांच्याकडून याची तयारी सुरू होती. चिदंबरम पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत बहुमत हुकलं तरी भाजपा घटनेमध्ये दुरुस्ती करण्याची योजना आखत आहे, मोदी सरकार आरक्षण संपुष्टात आणण्याची किंवा तसं काही करण्यासा मागेपुढे पाहणार नाही. ईडब्ल्यूएसमधून १० टक्के आरक्षण कायम ठेवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये दिलेल्या निकालाबाबत चिदंबरम म्हणाले की, पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ३-२ अशा फरकाने याबाबतचा निकाल दिला होता. उर्वरित दोन न्यामूर्तींनी याबाबत नोंदवलेल्या अहसमतीबाबत कुणी वाचलंय का? एक दिवस ३-२ अशा बहुमताने दिलेला निकाल बदलताही येऊ शकतो. तसेच हे लवकरच होईल, अशी अपेक्षा आहे, असं भाकितही पी. चिदंबरम यांनी केलं.

### गंज, चुकीची वेल्डिंग, कमकुवत फ्रेममुळे पुतळा कोसळला

सिंधुदुर्ग पोलिसांनी वैभव नाईक यांना नोटीस पाठवली आहे. वैभव नाईक यांनी पत्रकार परिषद घेऊन घोटाळा झाल्याचं आरोप केले होते. पुरावे पोलिसांकडे सादर करून सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. तर या अहवालावर सुप्रिया सुळे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. 'अर्थात यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. एवढे मोठे दैवत आहे आणि त्याचं वेल्डिंग नीट झाले नाही यात भ्रष्टाचार झाला.' असल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

# आण्विक धोरण बदलणार, रशियाला वाचवण्यासाठी हे गरजेचे आहे

## पुतिन यांचा पाश्चिमात्य देशांना अण्वस्त्र हल्ल्याचा इशारा

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पुन्हा एकदा पाश्चात्य देशांना अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी दिली आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, पुतिन यांनी बुधवारी राजधानी मॉस्कोमध्ये सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलावली होती. त्यात त्यांनी म्हटले आहे की, सरकार अण्वस्त्रांच्या वापराशी संबंधित अटी आणि शर्ती बदलणार आहे.

पुतिन म्हणाले की, देशाच्या आण्विक नियमांमध्ये अनेक नवीन गोष्टी जोडल्या जातील. यात रशियाविरुद्ध क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्यांविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर



यांचाही समावेश आहे. देशाच्या सार्वभौमत्वाला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या रशियन प्रदेशावर मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ला झाल्यास रशिया अजूनही अण्वस्त्रे वापरू शकतो.

अण्वस्त्र नसलेल्या देशाने जर अण्वस्त्रधारी देशाच्या पाठिंब्याने रशियावर हल्ला केला तर तो दोन्ही देशांनी केलेला हल्ला मानला जाईल, असेही रशियाचे अध्यक्ष म्हणाले. ते म्हणाले की, रशियाची अण्वस्त्रे ही देशाच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेची सर्वात मोठी हमी आहे.

पुतिन म्हणाले, आण्विक धोरणात बदल ही काळाची गरज रशियामध्ये लांब पल्ल्याची हल्ला करणारी क्षेपणास्त्रे वापरण्यासाठी युक्रेन पाश्चात्य देशांकडून परवानगी मागत असताना पुतीन यांचे हे विधान आले आहे. पुतिन म्हणाले की, अण्वस्त्रांच्या वापरासाठी परिस्थिती बदलणे आवश्यक आहे, कारण जग वेगाने बदलत आहे. ब्रिटनने युक्रेनला स्टॉर्म शॅडो आणि अमेरिका आर्मी टॅक्टिकल मिसाइल सिस्टम (ATACMS) क्षेपणास्त्रे दिली आहेत. ही लांब पल्ल्याची प्राणघातक क्षेपणास्त्रे आहेत, जी सुमारे 300 किमीपर्यंतच्या लक्ष्यांवर अचूक मारा करू शकतात.

युक्रेन ही क्षेपणास्त्रे रशियात नाही तर फक्त त्याच्या सीमेत वापरू शकते. युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना हे निर्बंध हटवायचे आहेत जेणेकरून ते रशियामध्ये लांब पल्ल्याची शस्त्रे वापरू शकतील. झेलेन्स्की सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. ते रशियावर लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे सोडण्याची परवानगी बायडेन यांना मागू शकतात.

## जपानी युद्धनौका पहिल्यांदाच चीन-तैवानमधून गेली

**वृत्तसंस्था**
**बीजिंग**

एक जपानी युद्धनौका बुधवारी प्रथमच तैवान आणि चीन दरम्यानच्या तैवान सामुद्रधुनीतून गेली. पूर्व चीन समुद्रातून पश्चिमेकडे जाणाऱ्या जपानी युद्धनौकेने 10 तासांत 180 किमी अंतर कापले. बीबीसीने जपानी माध्यमांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे.

जेएस साजनामी नावाच्या या युद्धनौकेसोबत ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या युद्धनौकाही उपस्थित होत्या. दक्षिण चीन समुद्रात तीन देशांची नौदलाची जहाजे युद्धाभ्यासासाठी जात होती. खरं तर, चीन तैवान आणि तैवान सामुद्रधुनी या दोन्ही भागांवर आपला दावा करतो. अशा स्थितीत चीनला राग येऊ नये म्हणून आतापर्यंत जपानने दोन्ही देशांदरम्यान आपली जहाजे पाठवली नाहीत. चीनचे सरकारी मीडिया ग्लोबल टाईम्सने वृत्त दिले आहे की, जेव्हा इतर देशांची जहाजे तैवान सामुद्रधुनीतून जात होती, तेव्हा चिनी सैन्य संपूर्ण वेळ त्यावर लक्ष ठेवून होते. जपानच्या मुख्य कॅबिनेट सचिवांनी गुरुवारी सांगितले की, "चीनी सैन्याने जपानच्या हवाई हद्दीचे वारंवार उल्लंघन केल्यानंतर देशात संकटाचे वातावरण निर्माण झाले आहे."

## राष्ट्राध्यक्ष मुइज्जूंना फेसबूकवरुन जीवे मारण्याची धमकी

**वृत्तसंस्था**
**माले**

मालदीवचेराष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आले आहे. फेसबुकवर एका व्यक्तीने जीवे मारण्याची धमकी दिली. मालदीव पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास सुरू केला आहे. लवकरच कारवाई करणार असल्याचे पोलिसांनी सांगिकले. अबलोर म्याद योसेफ असे धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांने स्थानिक भाषेत फेसबुकवर धमकी दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्राध्यक्षांना धमकी देण्यात आल्याची माहिती त्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळाली. यानंतर त्यांनी २-३ सोशल मीडिया हँडलवर नजर ठेवली आहे. लवकरात लवकर कारवाई करण्यात येणार असून ते अलर्ट आहेत, असे सहाय्यक पोलिस आयुक्त अहमद शिफान यांनी सांगितले. माजी राष्ट्रपती अब्दुल्ला यामीन यांना भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपाखाली तुरुंगात टाकल्यानंतर मोहम्मद मुइज्जू राष्ट्राध्यक्ष झाले. यामीनचा उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. यामीन निवडणूक लढवण्यास अपात्र ठरले होते.

# मोदी शक्तिशाली आहेत, पण देव नाहीत...

## केजरीवालांची विधानसभेत टीका

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी गुरुवारी विधानसभेत संबोधित केले. राजीनामा दिल्यानंतर प्रथमच त्यांनी दिल्ली विधानसभेला संबोधित करताना भारतीय जनता पक्षावर (भाजप) हल्ला चढवला.

"मनीष सिसोदिया आणि मला इथे पाहून विरोधी पक्षातील माझ्या सहकाऱ्यांना दु:ख झाले असेल. मी नेहमी म्हणतो की पंतप्रधान मोदी खूप शक्तिशाली आहेत आणि त्यांच्याकडे भरपूर संसाधने आहेत, पण मोदी हे देव नाहीत. देव आपल्यासोबत आहे. मला न्यायालयाचे आभार मानायचे आहेत", असं अरविंद केजरीवाल म्हणाले.

एकेकाळी मुख्यमंत्रिपदाच्या 'नंबर वन' खुर्चीवर विराजमान झालेल्या केजरीवाल यांना त्यांच्या पूर्वीच्या पदापासून काही अंतरावर ४१ क्रमांकाची जागा देण्यात आली. त्यांची उत्तराधिकारी आतिशी आता मुख्यमंत्रिपदावर विराजमान आहेत, तर केजरीवाल यांचे विश्वासू लेफ्टनंट मनीष सिसोदिया यांना त्यांच्या शेजारी ४० क्रमांकाची सीट देण्यात आली.

मद्य वितरण योजनेतील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आप पक्षाच्या अनेक नेत्यांवर कारवाई सुरू आहे. या करवाईनुसार मनिष सिसोदिया, अरविंद केजरीवाल यांना तुरुंगवास झाला आहे. केजरीवाल यांनी दावा केला की, भाजपाच्या एका वरिष्ठ नेत्याशी नुकत्याच झालेल्या संभाषणामुळे त्यांना आश्चर्य वाटले.

"मी विचारले की मला अटक केल्याने त्यांना कशी मदत झाली. त्यांनी मला सांगितले की त्यांनी मला अटक करून संपूर्ण दिल्ली सरकारला पायउतार केले", असं केजरीवाल म्हणाले. "त्यांनी मला जे सांगितले त्याचे मला आश्चर्य वाटले. दिल्लीतील लोकांचे जीवन उद्ध्वस्त करून आनंद साजरा करणारा असा हा कोणता पक्ष आहे, याचे मला आश्चर्य वाटते."

## लेबनॉनमधील युद्ध थांबवण्यास नेतन्याहू यांचा नकार

**जेरुसलेम**

इस्रायलने लेबनॉनमधील युद्ध थांबवण्यास नकार दिला आहे. इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयाने गुरुवारी, 26 सप्टेंबर रोजी सोशल मीडियावर ही माहिती दिली. युद्धबंदीचे वृत्त चुकीचे असल्याचे म्हटले आहे. अमेरिका आणि फ्रान्सने युद्ध थांबवण्याची मागणी केली होती, असे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या कार्यालयाने म्हटले आहे. यावर नेतन्याहू यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. इस्रायलच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार, लष्कर पूर्ण ताकदीने लेबनॉनमध्ये लढत राहील. त्याचवेळी हिजबुल्लाहने इस्रायलच्या राफेल लष्करी केंद्रावर 45 रॉकेट डागले आहेत. यात किती नुकसान झाले हे अद्याप समजू शकलेले नाही. लेबनॉनने इस्रायलच्या एकर भागात 45 क्षेपणास्त्रे डागली. यातील अनेक जण समुद्रात पडले.

## पाकिस्तानमध्ये जमिनीच्या वादावरून शिया-सुन्नी यांच्यात पुन्हा संघर्ष, 36 ठार

**वृत्तसंस्था**
**इस्लामाबाद**

पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वामधील कुर्रम जिल्ह्यात शिया आणि सुन्नी मुस्लिमांमधील जमिनीच्या वादात किमान 36 लोक ठार झाले आहेत. तर 80 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. वृत्तसंस्था एपीने दिलेल्या माहितीनुसार, दोन समुदायांमध्ये 5 दिवसांपासून संघर्ष सुरू आहे. कुर्रममध्ये तैनात असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, लढाईत अनेक घरे जळाली आहेत.

हिंसाचार संपवण्याचे सरकारचे प्रयत्न आतापर्यंत अयशस्वी ठरले आहेत. वृत्तानुसार, गेल्या काही वर्षांत कुर्रममध्ये शिया-सुन्नी वाद अनेकवेळा झाले आहेत. सुन्नी समुदायाला सीमेपलीकडील अफगाण जमातींकडून पाठिंबा मिळतो. जुलैमध्येही दोन समुदायांमध्ये जमिनीवरून वाद सुरू झाला होता, ज्यात 50 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर परिसरात सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.

दोन कुटुंबात सुरू झालेली भांडणे जिल्हाभर पसरली या वादाचे मूळ 30 एकर जमिनीचे आहे. कुर्रम जिल्ह्यातील बुशेहरा गावात दोन जमातींमध्ये मालकी हक्कावरून वाद आहे. ऑगस्टमध्ये, आदिवासी समुदायाच्या जिरगाच्या वडिलधाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी दोन समुदायांमध्ये एक करार घडवून आणला, त्यानंतर हा वाद काही काळ शांत झाला.

# भारताने UNSC चे स्थायी सदस्य व्हावे : मॅक्रॉन

## जपान, जर्मनीसह 2 आफ्रिकन देशांच्या सदस्यत्वासाठी समर्थन

**वृत्तसंस्था**
**न्यूयॉर्क**

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी UNSC (युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल) मध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वाचे समर्थन केले आहे. गुरूवार, 25 सप्टेंबर रोजी युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली (UNGA) ला दिलेल्या भाषणात मॅक्रॉन म्हणाले की फ्रान्स UNSC मध्ये स्थायी सदस्यांची संख्या वाढवण्यास समर्थन देतो.

भारताव्यतिरिक्त, मॅक्रॉन यांनी जर्मनी, जपान, ब्राझील आणि 2 आफ्रिकन देशांना UNSC मध्ये सदस्यत्व मागितले आहे. यूएनएससीला सर्वसमावेशक बनवण्यासाठी त्यांनी हे आवश्यक पाऊल म्हटले आहे. याशिवाय मॅक्रॉन यांनी संस्थेच्या कामात बदल करण्यासाठी सुधारणांची गरज असल्याबद्दलही बोलले.



*सुरक्षा परिषदेत एकूण 15 सदस्य देश आहेत, त्यापैकी 5 स्थायी (P-5) आणि 10 अस्थायी आहेत. स्थायी सदस्यांमध्ये अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन यांचा समावेश आहे. स्थायी सदस्यांपैकी कोणताही देश कोणत्याही निर्णयाशी असहमत असेल तर तो व्हेटो पॉवर वापरून तो मंजूर होण्यापासून रोखू शकतो.*

यापूर्वी, 21 सप्टेंबर रोजी क्वाड देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात त्यांनी UNSC मध्ये सुधारणा करण्यास सांगितले होते. त्यात आफ्रिकन, आशियाई, लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन देशांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. UNSC मध्ये 5 स्थायी सदस्य आहेत - अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन. यापैकी 4 देश भारताला पाठिंबा देण्यास तयार आहेत, मात्र चीन अडसर ठरत आहे. भारताला UNSC मध्ये स्थायी सदस्यत्व का हवे आहे? युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल किंवा UNSC हे संयुक्त राष्ट्रांच्या सहा प्रमुख अंगांपैकी एक आहे. ही संयुक्त राष्ट्राची सर्वात शक्तिशाली संस्था आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि UN चार्टरमध्ये कोणतेही बदल मंजूर करण्यासाठी ते जबाबदार आहे.

काही प्रकरणांमध्ये UNSC आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी किंवा पुनर्संचयित करण्यासाठी प्रतिबंध किंवा शक्तीचा वापर करू शकते. म्हणजेच भारत जर UNSC चा स्थायी सदस्य झाला तर जगातील कोणत्याही मोठ्या मुद्द्यावर त्याची संमती आवश्यक असेल.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांचे राजकीय एन्काऊंटर केले

## रामदास आठवलेंचा संजय राऊतांवर पलटवार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

संजय राऊत म्हणतात शिंदेंनी शिंदेच एन्काऊंटर केलं. पण एकनाथ शिंदेंनी शिवसेनेचे एन्काऊंटर केलं. उद्धव ठाकरेंच राजकीय एन्काऊंटर केलं" अशा शब्दात रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी शिवसेना प्रवक्ते संजय राऊत यांच्यावर टीका केली.

"अक्षय शिंदे याने केलेला प्रकार निंदनीय होता. माणुसकीला कलंक लावणारी ती घटना होती. मी आणि सर्वांनी मागणी केली होती की, नराधम अक्षय शिंदेला फाशी व्हायला



पाहिजे. त्याने पोलिसांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्याच्यावर गोळी झाडावी लागली. विरोधी पक्षाने यावर आता राजकारण करण्याची काही गरज नाही" असं स्पष्ट मत ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केले.दिल्लीतील ना.रामदास आठवले यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

महायुतीमध्ये जागावाटपावर चर्चा सुरू आहे. मोठ्या पक्षात सीटचा वाद आहे. अमित शाह महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून ते जागांवर तोडगा काढतील. माझ्या रिपब्लीकन पक्षाला 10 ते 12 जागा आम्हाला मिळाव्यात. या जागा सगळ्या महाराष्ट्रातील आहेत. आम्हाला त्या जागा मिळाल्या तर दलित मतांना महायुती कडे वळवण्यात यश येईल" असे ना.रामदास आठवले म्हणाले.

"दलित मतदार आपल्या महायुती च्या बाजूला वळवण्यासाठी रिपब्लीकन पक्षाला एक विधानपरिषद आणि 2 महामंडळं मिळावित, ही आमची मागणी आहे" असे ना .रामदास आठवले म्हणाले.

